



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ९१ * नांदेड * मंगळवार, दि. ७ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

# मी ४ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या साहेबांची सून, ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजितदादांची पत्नी!

## बारामतीत अर्ज भरण्याआधी सुनेत्रा पवार भावूक

**पुणे (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सोमवारी बारामती पोटनिवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरला आहे. त्याआधी बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा मेळावा झाला. महायुतीचा भक्कम पाठिंबा आपल्याला आहे. अजितदादांचा विचाराचा वारसा सांभाळात मी काम करीत राहील. ४ वेळा मुख्यमंत्री राहिलेल्या साहेबांची सून म्हणून ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजितदादांची पत्नी म्हणून मला राज्य सांभाळायाची ताकद मिळेल, असंही सुनेत्रा पवार म्हणाल्या. पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याआधी बारामतीमध्ये झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात सुनेत्रा पवार यांनी भाषण केलं. यावेळी सुनेत्रा पवार भावूक झाल्या.

या मेळाव्यासाठी सुनेत्रा पवार, जय पवार, पार्थ पवार, सुनील तटकरे, अदिती तटकरे, दिलीप वळसे पाटील, नरहरी झिरवळ, दत्तात्रय भरणे, बाबासाहेब पाटील, संजय बनसोडे, चेतन तुपे, सना मलिक, सरोज अहिरे, अनिकेत तटकरे, अंकिता पाटील,व अनिल पाटील, धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे, उमेश पाटीलसह, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, दोन महिन्यांआधी अजितदादांना गमावलं. अजितदादा आपल्यात नाही, असं आजही वाटत नाही. मला स्वप्नातही वाटलं नव्हतं, की बारामतीची पोटनिवडणुक होईल. अजितदादांनी शेवटचा श्वासही बारामतीत घेतला, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. बारामतीकरांकडे बघूनच मला धीर आला, असंही सुनेत्रा पवारांनी सांगितले.

बारामतीच्या प्रत्येक वास्तुला अजितदादांचा स्पर्श आहे. बारामतीची प्रतिष्ठा जराही कमी होऊ देणार नाही. अजितदादांनी मताधिक्यांचे विक्रेम मोडून काढले आहेत. ही निवडणूक नाही, अजितदादांना श्रद्धांजली वाहण्याची संधी, असंही सुनेत्रा पवारांनी सांगितलं. अजितदादा शब्दाला जागणारे नेते होते. अजितदादांसाठी बारामती आईसारखी होती. बारामतीचा विकास पूर्वीसारखा वेगाने होईल. नवीन प्रकल्प, गुंतवणुकीसाठी मी प्रयत्न करेन, असं आश्वासन सुनेत्रा पवारांनी यावेळी दिलं.

बारामतीमधील प्रत्येक नागरिक माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत. मी तुम्हाला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही, असंही सुनेत्रा पवार म्हणाल्या. ही निवडणूक ही माझी नसून बारामतीकरांची आहे आणि बारामतीकरांचं अजितदादांवर किती प्रेम आहे, हे सांगायला नको. बारामतीकरांनी ही निवडणूक आपल्या हातात घेतली आहे. आजपर्यंत तुम्ही अजितदादांना साथ दिली, त्यापेक्षाही काकणभर (थोडी अधिक) मला जास्त साथ द्याल, असा विश्वास मला आहे, असं सुनेत्रा पवारांनी सांगितले.

# श्रीनगर भागात सोनू कल्याणकरची सपासप वार करीत हत्या

- पोलिसांनी गोळीबार करत आरोपीला केली अटक
- जुन्या वादातून हत्या, ४ आरोपींना अटक
- तीन दिवसांत पाच खून

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील श्रीनगर भागातील बी. के. हॉल रोडवर युवा सेनेचा (शिंदे गट) पदाधिकारी सोनू कल्याणकर याची खंजर व तलवारीने भोसकून खून करण्यात आला. ही घटना सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या घटनेमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नांदेड शहरात शनिवारी रात्री डी मार्टजवळ गँगवारमधून तीन जणांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर रविवारी वजिराबाद पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मुरमुरा गल्लीत पूर्ववैमनस्यातून एका तरुणाचा तलवारीने वार करून खून करण्यात आला होता. दोन दिवसांत झालेल्या खुनाच्या घटनेचा तपास व आरोपींना अटक करण्याची कारवाई पोलिसांकडून सुरु असतानाच सोमवारी सकाळी खुनाची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली. शिंदेंच्या युवा सेनेचा पदाधिकारी असलेला अनिकेत उर्फ सोनू कल्याणकर हा सोमवारी पहाटे साडेपाच ते सहाच्या दरम्यान आपल्या पाळीव श्वान सोबत घेवून मॉर्निंग वॉकसाठी जात असताना श्रीनगर भागातील बी. के. हॉल रोडवर चारचाकी वाहनात दबा धरून बसलेल्या पाच ते सहा जणांनी खंजर व तलवारीने सोनू कल्याणकर याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात सोनू कल्याणकर हा जागीच ठार झाला. घटनेनंतर आरोपी हे चारचाकी वाहनात बसून पळून गेले. घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक उदय खंडेराय, भाग्यनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक संतोष तांबे, पोलीस उपनिरीक्षक सचिन सोनवणे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करुन सोनू



कल्याणकर याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

घटनेतील आरोपींचा पोलिसांनी तात्काळ शोध सुरु केला असून पोलीसांनी रोहित लोट, प्रसाद उर्फ पियुष शिवाजी शिंदे, कृष्णा जोगदंड, औया तिघांना अटक केली. स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पाठीमागे असलेल्या झरी खदानीजवळ अंकुश गंदमवार याच्यावर गोळीबार करुन त्यास जेरबंद केले आहे. यावेळी आरोपी अंकुश गंदमवार हा पोलिसांच्या दिशेने गोळीबार करण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांच्या गोळीबारात तो जखमी झाला. त्याच्यावर नांदेडच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आणखी काही आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरु आहे. सध्या तुरुंगात असलेल्या गोलू मंगनाळे याने सोनू कल्याणकर याच्या हत्येची सुपारी दिल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. यापूर्वीही सोनू कल्याणकर याच्यावर प्राणघातक हल्ल्याची घटना घडली होती. सोनू कल्याणकर याच्यावरही विविध पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल होते असे पोलिसांनी सांगितले. जुन्या वादातून खूनाची घटना घडल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. या खून प्रकरणी आरोपी रोहित लोट, अंकुश गंदमवार, जोगदंड मधू आणि प्रसाद उर्फ पियुष शिंदे यांच्यासोबतच गोलू मंगनाळे (सध्या कारागृहात वास्तव्य) आणि त्याचे वडील विजयचंद्र मंगनाळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

# कोणत्याही गुंडांना राजाश्रय मिळणार नाही; पोलिसांनी कठोर भूमिका घ्यावी -खा. चव्हाण



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर परिसरात गेल्या तीन दिवसांत खुनाची पाचवी घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा भाजप खासदार अशोकराव चव्हाण यांनी आपली भूमिका मांडली आहे. पोलिसांनी तातडीने पावले उचलून वाढत असलेल्या गुंडगिरीचा बिमोड करावा. कोणत्याही गुंडांना राजकीय आश्रय मिळू नये आणि मिळणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी असे मत खासदार चव्हाण यांनी व्यक्त केले.

नांदेड शहरात सध्या गँगवॉरचा भडका उडाल्याचे दिसून येत आहे. तीन दिवसांपूर्वी ई-स्क्वेअर परिसरात झालेल्या गँगवॉरमध्ये २ जणांचा बळी गेला तर या सुडाच्या भावनेपोटी याच गुन्ह्यातील जखमीला शासकीय रुग्णालयात उपचार घेत खंजरने घुसून खून करण्यात आला. त्यानंतर शनिवारी रात्री जुना मोंढा भागात एकाची हत्या झाली. पुन्हा सोमवारी सकाळी श्रीनगर भागात राजकीय कार्यकर्ता असलेल्या सोनू कल्याणकर याचा भर रस्त्यावर खून करण्यात आला.

### खुनाच्या घटना दुर्दैवी -आ.हेमंत पाटील

शहरात सध्या कायदा व सुव्यवस्था पूर्णतः बिघडली असून पोलिसांची वचक गुन्हेगारांवर कमी झाल्याचे दिसून येत आहे. एका आठवड्यात जिल्ह्यात पाच खुनाच्या घटना घडल्याने नांदेडकर भयभीत झाले आहेत. लवकरात लवकर या प्रकरणात पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे आ. हेमंत पाटील यांनी सांगितले.

या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर खा. अशोकराव चव्हाण यांनी माध्यमांवर समोर आपली भूमिका मांडली. यावेळी खा. चव्हाण म्हणाले, जिल्हा व राज्यात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्याचे काम पोलीस यंत्रणेचे आहे. यासाठी आमचे सहकार्य राहील. कोणत्याही गुंडांना राजकीय आश्रय मिळू नये आणि मिळणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. जे घडले ते वाईट आहे, पोलिसांनी याबाबत तातडीने पावले उचलून गुंडगिरीचा बिमोड करावा. या घटना कशा घडत आहेत, यामागे कोण आहे, याची चौकशी करून कारवाई करावी अशी

# इन्स्टाग्रामवर अवैध पिस्टल व राऊंड विक्रीचे व्हिडिओ; एकास अटक



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** इन्स्टाग्राम आयडीवर अवैध पिस्टल व राऊंडच्या विक्री करण्यासाठीचे व्हिडिओ पोस्ट करणाऱ्या इसमावर कारवाई करत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊटअंतर्गत अवैध गावठी पिस्टल चालविणाऱ्या आरोपींवर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना दिले आहेत. नांदेड शहरात खुनासारख्या झालेल्या गंभीर घटनेच्या अनुषंगाने दि. ६ एप्रिल रोजी नांदेड शहरातील सराईत गुन्हेगारांच्या सोशल मीडिया अकाऊंटची तपासणी करीत असताना आरोपी शेख फरहानच्या इन्स्टाग्राम आयडीवरुन पिस्टल व राऊंडचे व्हिडीओ विक्री करण्याच्या व दहशतीच्या उद्देशाने पोस्ट केल्याचे दिसून आले. आरोपीचा शोध घेतला असता तो इकबालनगर पाण्याच्या टाकीजवळ संशयीतरित्या मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली असता एक लोखंडी खंजर, एक रियलमी कंपनीचा मोबाईल मिळून आला. आरोपी शेख फरहान याने त्याच्या इन्स्टाग्राम आयडीवरुन बदला तो जरुर लेंगे अशी पोस्ट टाकून शत्रुत्व, द्वेष भावना, दुर्भावना निर्माण करण्याचे उद्देशाने खोटी विधाने, अफवा प्रसारित केल्याने त्याच्यावर कायदेशीर कारवाई करुन ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोकॉ सचिन चंद्रकांत चवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईबद्दल पोनि चिंचोलकर यांनी पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अमंलदार वसंत केंद्रे, मारोती पंचलिग, समीर अहेमद, शंकर माळगे, धम्मपाल कांबळे व अंमलदार यांचे अभिनंदन केले आहे.

# मुखेड तालुक्यातही खुनाची घटना; पत्नीच्या हत्येप्रकरणी पतीला अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड तालुक्यातील कर्णा येथे पतीने पत्नीला राहत्या घरी साडीने गळफास देऊन खून केला. याप्रकरणी पोलिसांनी मारेकरी पतीला अटक केली आहे.

आरोपी मारोती बाबुराव खांडेकर याने दि. ५ एप्रिल रोजी रात्री ८ ते दि.६ च्या सकाळी ७ च्या दरम्यान पत्नी स्वाती मारोती खांडेकर (वय ३०) हिला आपल्या राहत्या घरी अंगावरील साडीने गळफास देवून मारुन टाकले. त्यानंतर आरोपी मारोती खांडेकर हा फरार झाला होता. सकाळी त्याच्या लहान मुलाने आई उठत नसल्याचे बघून आरडाओरड केल्याने शेजाऱ्यांना ही बाब निदर्शनास आली. या संदर्भात मयत स्वातीचा भाऊ योगेश गणपत देवकते यांनी मुखेड ठाण्यात येऊन बहिणीचे पती मारोती बाबुराव खांडेकर यांनीच बहिणीचा खून केल्याची तक्रार दिली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे वृत समजताच पोलीस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे, पोउप अभिजीत तुतुरवाड आदींनी आरोपीचा पाठलाग करून आरोपीला जेरबंद केले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजीत तुतुरवाड करत आहेत.

# नांदेड-उस्माननगर रोडवर भरधाव टिप्परची स्कुटीला धडक; एकाचा मृत्यू

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड-उस्माननगर रोडवर भरधाव वेगाने येणाऱ्या टिप्परने स्कूटीला धडक दिली. या अपघातात स्कुटीचालकाचा मृत्यू झाल्याची घटना दि. ६ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास घडली.

या प्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार दि. ६ मार्च रोजी सायंकाळी संतोष देविदास लघुळे रा. गोपाळचावडी ता.जि. नोंदड हे स्कुटी क्र. एम.एच.२६ बी.डी. ५५०९ वर बसून सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास आपल्या घराकडे जात होते. यावेळी टिप्परने त्यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण ठाणयचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले व पोलीस अंमलदार मारोती माने व गरड यांनी भेट देऊन मयताचे प्रेत शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनसाठी पाठविले. या अपघात प्रकरणी टिप्पर व स्कुटी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे लावण्यात आली असून अधिक तपास पोलीस अमंलदार माने हे करीत आहेत. भरधाव वेगाने जाणाऱ्या हायवा टिप्परचा चार दिवसांतील नांदेड-उस्माननगर रोडवरील दुसरा बळी आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील महाभियोग प्रस्ताव फेटाळला, विरोधकांना झटका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात दाखल केलेला महाभियोग प्रस्ताव फेटाळण्यात आला आहे.


तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वात विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत महाभियोग नोटीस दिली होती. महाभियोग प्रस्ताव फेटाळल्यानं हा विरोधी पक्षांना मोठा झटका मानला जात आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील महाभियोग प्रस्ताव राज्यसभेच्या सभापतींनी फेटाळून लावला आहे. विरोधी पक्षांच्या खासदारांनी मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याची मागणी केली होती. मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वात विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत महाभियोग नोटीस दिली होती. मात्र, राज्यसभेच्या सभापतींनी ही नोटीस स्वीकारण्यास नकार दिला आहे.

मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात १२ मार्च रोजी हा महाभियोग प्रस्ताव सादर करण्यात आला होता. राज्यसभेत ६३ खासदारांनी या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. तर लोकसभेत १३० खासदारांनी या प्रस्तावावर सह्या केल्या होत्या. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यात यावे, असा उद्देश हा प्रस्ताव दाखल करण्यामागे होता.

# 'पीएनजी' क्षेत्रातील नागरिकांना ३० जूननंतर गॅस पुरवठा बंद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाईपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी पीएनजी जोडणीसाठी येत्या ३० जूनपर्यंत अर्ज किंवा नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा ३० जूननंतर बंद केला जाईल, असा इशारा राज्य सरकारच्या वतीने देण्यात आला आहे.




# महाराष्ट्र विधानमंडळ अंदाज समिती नांदेड जिल्हा दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य विधानमंडळ अंदाज समिती ७ ते १० एप्रिल २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ही समिती नांदेड जिल्ह्यातील विविध विभागांतर्गत सुरू असलेल्या कामांना भेट देऊन पाहणी करणार आहे.

मंगळवार, ७ एप्रिल २०२६ रोजी रात्री शासकीय विश्रामगृह नांदेड येथे मुक्काम. बुधवार, ८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते ९.३० वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह नांदेड येथील संबंधित विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करणार आहेत.

सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनांना भेटी व पाहणी करणार आहेत.

दुपारी ३ ते सायं. ५.३० वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी करणार आहेत.

गुरूवार, ९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी करणार आहेत.

शुक्रवार, १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत नांदेड जिल्ह्यातील महसूल (मुद्रांक व नोंदणी, भूमि अभिलेख, भूसंपादन) विभाग, वन विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून), आदिवासी विकास विभाग, नगर विकास (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती) विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि प्रधानमंत्री ग्रामसडक योजना) विभाग, गृह विभाग, गृह (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन) विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य (पर्यटन) विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार विभाग, पणन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व जलसंपदा विभाग या विभागांतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प, कामे योजनाना भेटी व पाहणी करतील.

दुपारी ३ ते सायं. ५ वाजेपर्यंत संबंधित विभागाच्या प्रकल्प, कामांना, कार्यालयांना दिलेल्या भेटी व पाहणीच्या वेळी आढळून आलेल्या बाबीच्यासंदर्भात व लेखी स्वरूपात झालेल्या माहितीच्या अनुषंगाने संबधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक होईल.

# तेहरानजवळील निवासी इमारतीवर बॉम्ब हल्ला, १३ जणांचा मृत्यू

**तेहरान (वृत्तसंस्था)–** सोमवारी पहाटे इराणची राजधानी तेहरानच्या दक्षिण-पश्चिम भागातील इस्लामशहरजवळ एका निवासी इमारतीवर झालेल्या हवाई हल्ल्यात किमान १३ जणांचा मृत्यू झाला. इराणी माध्यमांच्या माहितीनुसार, हा हल्ला शहराजवळील परिसरात झाला; मात्र इमारतीला लक्ष्य करण्यामागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

स्थानिक वृत्तसंस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्ल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला असून बचाव व मदतकार्य सुरू आहे. अनेक लोक अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे, कारण अनेक जण गंभीर जखमी आहेत आणि काही लोक अजूनही मलब्याखाली दबलेले असण्याची शक्यता आहे. दरम्यान, तेहरानमधील शरीफ तंत्रज्ञान विद्यापीठालाही लक्ष्य करण्यात आले. इराणी माध्यमांनुसार, या हल्ल्यात विद्यापीठाच्या काही इमारतींचे नुकसान झाले असून जवळील गॅस वितरण केंद्रही प्रभावित झाले आहे. मात्र, विद्यापीठ परिसरातील नेमके लक्ष्य काय होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, इस्रायलमध्ये सुरक्षा यंत्रणांनी क्षेपणास्त्र हल्ल्याचा इशारा जारी केला, तर संयुक्त अरब अमिरातीतील दुबई येथेही दोन वेळा अशाच प्रकारचे अलर्ट वाजवण्यात आले. तेथे हवाई संरक्षण प्रणाली सक्रिय करण्यात आली; मात्र इराणकडून नेमके कोणते लक्ष्य साधले गेले होते, हे स्पष्ट होऊ शकले नाही. कुवैतनेही रात्रीभर अनेक वेळा आपल्या हवाई संरक्षण प्रणालीचा वापर करून संभाव्य धोके परतवून लावल्याचा दावा केला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# ज्येष्ठ नागरिक : समृद्ध अडगळ?

भारतीय संस्कृतीत 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' ही मूल्ये केवळ म्हणीपुरती उरली आहेत का, असा प्रश्न आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवाकडे पाहताना उपस्थित होतो. संयुक्त कुटुंबपद्धती मागे पडून त्रिकोणी कुटुंबांचा जमाना आला आणि घरातील वडीलधाऱ्यांचे स्थान हळूहळू दुय्यम होत गेले. आधुनिकतेच्या आणि व्यस्त जीवनशैलीच्या नावाखाली ज्येष्ठांची उपेक्षा ही चिंताजनक सामाजिक समस्या बनत आहे. आज अनेक कुटुंबांमध्ये एक विचित्र प्रवृत्ती दिसून येते. लहान मुलांच्या संगोपनासाठी आजी-आजोबांची मदत घेतली जाते; मात्र मुले मोठी झाल्यावर त्याच ज्येष्ठांना दूर लोटले जाते. पती-पत्नी दोघेही नोकरीत गुंतलेले असल्याने घरातल्या मुलांसाठी ज्येष्ठांचा आधार अनिवार्य ठरतो, पण हा आधार केवळ 'गरजेपुरता'च मर्यादित ठेवला जातो. गरज संपली की, ज्येष्ठांना वृद्धाश्रमात पाठवण्याचे प्रकार वाढताना दिसतात. ज्यांना आपल्या म्हातारपणाची काठी मानून मुलांना वाढवले, त्यांच्याकडूनच अपमान, उपेक्षा, अगदी मारहाणीपर्यंतच्या घटना घडतात, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे. लग्नासाठी पसंती करीत असताना अनेक उपवर मुली मुलाकडे त्याचे आई-वडील नाहीत अशांनाच प्राधान्य देतात, ही दुर्दैवाची बाब आहे. ज्या ठिकाणी असे आई-वडील अर्थात सासू-सासरे आहेत त्यांना लग्न झाल्यानंतर एका वर्षाच्या आतच घराच्या बाहेर काढण्याची व्यवस्था देखील काही विद्वान मुली करीत असतात. याद्वारे आपण ज्येष्ठांवर अन्याय करीत आहोत हा विचार देखील त्यांच्या मनात येत नाही. यामागील कारणेही तितकीच गुंतागुंतीची आहेत. आर्थिक स्वार्थ, मालमत्तेवर डोळा, कौटुंबिक वाद, मानसिक ताणतणाव, गैरसमज आणि सामाजिक असुरक्षितता यामुळे ज्येष्ठांवरील अत्याचार वाढताना दिसत आहेत. महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांच्या हत्यांचे प्रमाणही वाढत असल्याची आकडेवारी धक्कादायक आहे. गेल्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांतच ६० ज्येष्ठांची हत्या झाल्याची माहिती समोर आली होती. ही केवळ आकडेवारी नसून समाजाच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या केवळ शारीरिक अत्याचारापुरत्या मर्यादित नाहीत. मानसिक आणि वैचारिक शोषण ही त्यांची मोठी वेदना आहे. अनेकदा त्यांच्या मतांचा, स्वाभिमानाचा आणि अस्तित्वाचाच अवमान केला जातो. कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत त्यांना स्थान दिले जात नाही. या पार्श्वभूमीवर, ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. याच संदर्भात तेलंगणामध्ये अलीकडेच मंजूर करण्यात आलेले 'एम्प्लॉईज अकाऊंटेबिलिटी अँड मॉनिटरिंग ऑफ पेरेंटल सपोर्ट' विधेयक हे एक महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. या कायद्यानुसार, पालकांची उपेक्षा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून ठरावीक रक्कम कपात करून ती पालकांना देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांबरोबरच लोकप्रतिनिधींनाही या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे. हा निर्णय केवळ कायदेशीर उपाय नाही, तर समाजाला दिलेला एक ठोस संदेश आहे, ज्येष्ठांची जबाबदारी टाळता येणार नाही. मुळात, पालकांची काळजी घेणे ही नैतिक जबाबदारी आहे. ती कायद्याने लादावी लागते, हीच बाब समाजासाठी लाजिरवाणी आहे. तथापि, वास्तव लक्षात घेता अशा कायद्यांची आवश्यकता निर्माण झाली आहे, हेही तितकेच खरे. कायद्याचा धाक दाखवल्याशिवाय अनेकदा समाजात बदल घडत नाहीत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. अगदी सती प्रथा आणि अस्पृश्यता रोखण्यासाठी देखील कायदे करावे लागले. ज्येष्ठांच्या संदर्भातील या कायद्याची अंमलबजावणी करताना काही व्यावहारिक अडचणीही लक्षात घ्याव्या लागतील. बहुतेक वेळा ज्येष्ठ नागरिक आपल्या मुलांवर अवलंबून असतात. त्यामुळे तक्रार केल्यास नातेसंबंध अधिक बिघडतील किंवा छळ वाढेल, या भीतीने ते पुढे येत नाहीत. त्यामुळे केवळ कायदा पुरेसा ठरणार नाही; तर त्याच्या अंमलबजावणीसाठी संवेदनशील आणि विश्वासार्ह यंत्रणा उभी करावी लागेल. हेल्पलाईन, समुपदेशन सेवा आणि गोपनीय तक्रार नोंदविण्याची सुविधा यांसारख्या उपाययोजना अत्यावश्यक ठरतील. तसेच ज्येष्ठ नागरिकांची नियमित विचारपूस करण्यासाठी पोलीस आणि प्रशासनाने सक्रिय भूमिका बजावणे गरजेचे आहे, पण असे होण्याची सुतराम शक्यता नाही. सध्या निराधार ज्येष्ठांसाठी काही योजना कार्यरत असल्या, तरी आपल्या मुलांसोबत राहणाऱ्या ज्येष्ठांकडेही लक्ष देणे तितकेच आवश्यक आहे. कारण अत्याचार अनेकदा घराच्या चार भिंतीआडच घडत असतात. महाराष्ट्रातही ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. ज्येष्ठांना सुरक्षित, सन्मानजनक आणि निरोगी जीवन जगता यावे, यासाठी योजनांची आखणी करण्यात आली आहे. मात्र, केवळ योजना जाहीर करून भागणार नाही; त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय बांधीलकी आवश्यक आहे. हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर समाजाच्या मूल्यव्यवस्थेचा आहे. ज्येष्ठांचा सन्मान हा संस्कृतीचा गाभा असतो. आधुनिकतेच्या प्रवाहात आपण ही मूल्ये विसरत चाललो आहोत का, याचे आत्मपरीक्षण करण्याची हीच वेळ आहे. प्रगतीच्या नावाखाली जर आपण आपल्या मुळांनाच विसरलो, तर ती प्रगती कितपत अर्थपूर्ण ठरेल? ज्येष्ठांचा सन्मान राखणे ही केवळ जबाबदारी नाही, तर आपली संस्कृती जपण्याची खरी कसोटी आहे. म्हणूनच आधुनिक पिढीला देखील ज्येष्ठ म्हणजे घरातील समृद्ध अडगळ, असे वाटू नये हे महत्त्वाचे.

# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया



दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफुड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.

आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो. शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# गिग इकॉनॉमी : रोजगाराची नवी क्रांती की असुरक्षिततेची दरी?

आजच्या २१ व्या शतकात नोकरीचे स्वरूप वेगाने बदलत आहे. एकेकाळी सरकारी नोकरी किंवा कायमस्वरूपी नोकरी हेच यशाचे गमक मानले जायचे, परंतु आज गिग इकॉनॉमीने या संकल्पनांना पूर्णपणे छेद दिला आहे. झोमॅटो-स्वीगीचे डिलिव्हरी बॉईज, ओला-उबरचे चालक, ग्राफिक्स डिझाइनर्स, आयटी कन्सल्टंट्स आणि कंटेंट रायटर्स हे सर्वजण या नव्या अर्थव्यवस्थेचे अविभाज्य भाग आहेत. या क्षेत्राला जशी संधीची झळाळी आहे, तशीच अनिश्चिततेची सावलीही आहे.

**सरकारी धोरणांची अपरिहार्यता**

गिग इकॉनॉमीमध्ये काम करणाऱ्यांची संख्या कोट्यवधींच्या घरात आहे, तरीही भारतीय कामगार कायद्यांच्या चौकटीत त्यांना अजूनही कामगार हा दर्जा पूर्णपणे मिळालेला नाही.

**व्याख्या आणि कायदेशीर संरक्षण:** केंद्र आणि राज्य सरकारांनी गिग वर्कर आणि प्लॅटफॉर्म वर्कर यांच्यासाठी स्पष्ट कायदेशीर व्याख्या ठरवणे गरजेचे आहे. त्यांना केवळ स्वतंत्र कंत्राटदार न मानता, त्यांना सामाजिक सुरक्षा मिळवून देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

**सामाजिक सुरक्षा संहिता २०२०:** या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. यामध्ये कंपन्यांनी त्यांच्या नफ्यातील ठराविक हिस्सा गिग वर्कर्सच्या कल्याणकारी निधीसाठी देणे बंधनकारक असावे.

**पगार आणि कामाचे तास:** सॉफ्टवेअर इंजिनिअर्सपासून ते डिलिव्हरी पार्टनर्सपर्यंत सर्वांसाठी किमान वेतनाचे नियम आणि कामाच्या तासांची मर्यादा निश्चित केली पाहिजे, जेणेकरून कंपन्यांकडून होणारी पिळवणूक थांबेल.

**फ्रीलांसर आणि कंत्राटी कामगारांसाठी स्वसुरक्षा उपाय**

गिग इकॉनॉमीमध्ये मालक आणि नोकर असे नाते नसते. येथे तुम्हीच तुमचे बॉस असता आणि तुम्हीच कर्मचारी. अशा वेळी स्वतःचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी खालील त्रिसूत्री वापरणे आवश्यक आहे.

**अ) आर्थिक नियोजन**

गिग वर्करचा पगार दरमहा ठराविक नसतो. त्यामुळे बजेटिंग अत्यंत महत्त्वाचे आहे.

**इमर्जन्सी फंड:** तुमच्या मासिक खर्चाच्या किमान ६ ते ९ पट रक्कम लिक्विड फंड किंवा सेव्हिंग अकाउंटमध्ये असावी. कामाच्या कमतरतेच्या काळात हा निधी आधार देतो.

**निवृत्ती वेतन:** ईपीएफ नसल्यामुळे, पीपीएफ किंवा एनपीएसमध्ये स्वतःहून गुंतवणूक सुरू करावी.

**ब) आरोग्य आणि जोखीम व्यवस्थापन**

**मेडिक्लेम:** सरकारी किंवा कॉर्पोरेट विमा नसल्याने, स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी किमान ५ ते १० लाखांचा स्वतंत्र आरोग्य विमा असणे अनिवार्य आहे.

**टर्म इन्शुरन्स :** कुटुंबातील कमावती व्यक्ती म्हणून स्वतःचा लाइफ इन्शुरन्स असणे गरजेचे आहे, जेणेकरून अनपेक्षित प्रसंगी कुटुंबाला आर्थिक धक्का बसणार नाही.

**क) सातत्यपूर्ण शिक्षण**

गिग इकॉनॉमीमध्ये जुने कौशल्य लवकर कालबाह्य होते. स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी दरवर्षी नवीन कोर्स करणे किंवा नवीन सॉफ्टवेअर शिकणे हीच तुमची खरी ३९;जॉब सिक्युरिटी३९; आहे.

**३. गिग इकॉनॉमी उपयोग आणि फायदे**

**वेळेची लवचिकता:** तुम्ही कधी काम करायचे आणि कधी सुट्टी घ्यायची, हे पूर्णपणे तुमच्या हातात



असते. हे महिलांसाठी आणि शिक्षण घेणाऱ्या तरुणांसाठी उत्तम आहे.

**मर्यादामुक्त उत्पन्न:** एकाच वेळी अनेक क्लायंट्ससोबत काम करून तुम्ही तुमच्या क्षमतेनुसार कितीही उत्पन्न मिळवू शकता.

**विविधता:** एकाच प्रकारचे काम करून येणारा कंटाळा येथे नसतो. दरवेळी नवीन प्रकल्प आणि नवीन आव्हाने समोर असतात.

**४. धोके आणि आव्हाने**

**उत्पन्नाची अनिश्चितता:** कधी कामाचा ओघ प्रचंड असतो, तर कधी महिनाभर काहीच काम नसते. यालाच हंगर अँड बर्स्ट सायकल म्हणतात.

**मानसिक ताण आणि एकाकीपणा:** ऑफिस संस्कृती नसल्यामुळे सामाजिक संवाद कमी होतो. सतत घरून काम केल्याने किंवा रस्त्यावर धावपळ केल्याने मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

**सुविधांचा अभाव :** पगारी सुट्ट्या, बोनस, ग्रॅच्युइटी आणि प्रमोशन यांसारख्या गोष्टींची येथे कमतरता असते.

**निष्कर्ष**-गिग इकॉनॉमी हे दुधारी शस्त्र आहे. हे तंत्रज्ञानस्नेही आणि कुशल लोकांसाठी वरदान ठरू शकते, तर नियोजन नसणाऱ्यांसाठी शाप. सरकारने धोरणात्मक कवच पुरवले आणि व्यक्तीने स्वतःहून आर्थिक शिस्त पाळली, तर ही अर्थव्यवस्था भारताच्या प्रगतीचे इंजिन ठरू शकते. भविष्यात कायमस्वरूपी नोकरी ही संकल्पना इतिहास जमा होईल आणि कौशल्य आधारित कंत्राटी काम हाच जगण्याचा मुख्य आधार असेल.

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक, भोसीकर फुड्स
नांदेड, महाराष्ट्र.
मो. ८८०५५७५५५५

# मानसिक स्वास्थ्यासाठी नियमित वाचन उपयोगी

आजच्या धक्काधकीत युवापिढीने वाचणे अत्यंत गरजेचे आहे. वाचाल तर वाचाल हे आपल्याला सांगणारे वाक्य आजही तितकेच सत्य आहे. वाचनामुळे माहिती आणि ज्ञानाचा खजिना उघडतो. कुठल्याही क्षेत्रात पुढे जायचे असेल, तर वाचन महत्वाचे आहे. चांगलं वाचन मनाला विचार करण्यास प्रवृत्त करतं. युवांना स्वतंत्र विचारसरणी आणि निर्णयक्षमता निर्माण करण्यात मदत होते. मराठी, हिंदी, इंग्रजी वा इतर कोणतीही भाषा असो, वाचनामुळे त्या भाषेतील गोडवा आणि परिणामकारकता शिकता येते.

महापुरुषांचे चरित्र, यशोगाथा, संघर्षकथा वाचून नव्या प्रेरणा मिळतात. अडचणींवर मात करण्याचं बळ मिळतं. मानसिक स्वास्थ्यासाठी उपयोगी मोबाईल पेक्षा एखादं चांगलं पुस्तक मन शांत करतं, विचारांना दिशा देते. स्पर्धा परीक्षा, करिअर प्लॅनिंग, कौशल्यवृद्धी यासाठी वाचन आवश्यक आहे. संवेदनशीलता आणि सामाजिक भान निर्माण होतं साहित्य, कादंबऱ्या, कविता यामधून समाजाचे विविध पैलू समजतात माणुसकी वाढते.



वाचनामुळे विविध विषयांवरील माहिती मिळते. ते केवळ शालेय किंवा महाविद्यालयीन अभ्यासापुरतेच मर्यादित नसून, विज्ञान, इतिहास, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, आत्मविकास अशा अनेक क्षेत्रांतील ज्ञान मिळते. वाचणारा माणूस विचार करू शकतो, वेगवेगळ्या दृष्टीकोनांनी गोष्टी पाहू शकतो. त्यामुळे त्याचा निर्णय घेण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. वाचनामुळे शब्दसंपत्ती वाढते, योग्य शब्दांचा वापर करता येतो, आणि व्यक्त होण्याची शैली प्रभावी होते. नियमित वाचन केल्याने मन स्थिर राहते, एकाग्रता वाढते, आणि मानसिक शांतता मिळते विशेषतः आजच्या धावपळीच्या जगात वाचनामुळे आत्मविश्वास वाढतो, नवीन संधी समजतात आणि स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्याची शक्यता वाढते.

पुस्तकं, लेख, वृत्तपत्रं, मासिकं वाचल्यामुळे विविध क्षेत्रांबद्दलची माहिती मिळते जसे की विज्ञान, इतिहास, तंत्रज्ञान, राजकारण, कला इत्यादी. वेगवेगळ्या लेखकांचे विचार, संस्कृती, अनुभव वाचल्याने जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. नियमित वाचन केल्याने आपली भाषा समृद्ध होते, नविन शब्द शिकायला मिळतात. कथा, कविता, आत्मचरित्र वाचल्यामुळे विचारशक्तीला चालना मिळते. वाचनामुळे आपली मांडणी स्पष्ट व प्रभावी होते, संवाद साधताना अधिक आत्मविश्वास वाटतो. वाचन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ज्ञान आणि वैचारिक समृद्धीचे दारही आहे. त्यामुळे रोज थोडावेळ वाचण्यासाठी द्यावा. वाचनामुळे आपल्याला विविध विषयांवर माहिती मिळते, ज्ञान वाढते आणि विचारशक्ती विकसित होते. वाचन केल्याने आपली समज वाढते, नवीन कल्पना आणि दृष्टीकोन प्राप्त होतात, तसेच व्यक्तिमत्व विकसित होते. त्यामुळे नियमित वाचन करणे खूपच उपयुक्त आहे.

आज तंत्रज्ञान, साधने आणि जीवनशैली झपाट्याने बदलत असली, तरी ज्ञानाचं मूल्य कधीच कमी झालेलं नाही. आणि हे ज्ञान मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाचं साधन म्हणजे वाचन. वाचन म्हणजे केवळ माहिती मिळवणं नव्हे, तर विचारांची खोली, कल्पकतेचा विस्तार, आणि आत्मविश्वासाचं बळ मिळवणं. डिजिटल युगात माहिती मिळणं सोपं झालं असलं तरी, माहितीचं रूपांतर ज्ञानात करायचं असेल तर समजूतदार आणि सातत्यपूर्ण वाचन गरजेचं आहे. वाचन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा पाया मजबूत करतं मग ते कोणतंही क्षेत्र असो.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया, रील्स, ऑडिओ व व्हीडीओंच्या भाऊगर्दीत वाचन बाजूला पडते आहे. पण वाचन हीच अशी सवय आहे जी यशस्वी आणि सजग नागरिक घडवते. सखोल ज्ञान, विचारशक्ती, आणि भाषेचं समृद्धीकरण वाचनामुळे कल्पनाशक्ती वाढते शब्दसंपत्ती समृद्ध होते व्यक्तिमत्त्व घडतं निर्णयक्षमता सुधारते समाज आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विस्तृत होतो म्हणूनच, काळ बदलला तरी ज्ञानाचं महत्व आणि त्यासाठी वाचनाची गरज कायम आहे.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# भोकर ग्रामीण रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

## १४ ते १५ वयोगटातील मुलींना गर्भाशयमुख कर्करोगापासून मिळणार सुरक्षा; पालकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**भोकर (प्रतिनिधी)**– जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संपूर्ण नांदेड जिल्ह्यात गर्भाशयमुख कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी एचपीव्ही (HPV) लसीकरण मोहीम राबवण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून भोकर येथील ग्रामीण रुग्णालयात १४ वर्षे पूर्ण झालेल्या मात्र १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींसाठी लसीकरण प्रक्रियेला उत्साहात सुरुवात करण्यात आली आहे.



नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, लातूर आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. ग्रामीण रुग्णालय भोकरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या सूक्ष्म नियोजनाखाली या लसीकरणाचा शुभारंभ झाला.

दोन मुलींना लस देऊन मोहिमेची सुरुवात सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी ग्रामीण रुग्णालयात दोन मुलींना एचपीव्ही लस देऊन या आरोग्य मोहिमेची रीतसर सुरुवात करण्यात आली. या वयोगटातील मुलींसाठी ही लस अत्यंत महत्त्वाची असून, भविष्यातील कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी ती प्रभावी ठरते.

गैरसमज दूर करून पालकांचे प्रबोधन सध्या सामाजिक माध्यमांवर लसीकरणाबाबत अनेक चुकीची माहिती आणि गैरसमज पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर रुग्णालयातील तज्ज्ञांनी पालकांशी संवाद साधून लसीचे महत्त्व पटवून दिले. पालकांच्या शंकांचे निरसन केल्यानंतर त्यांनी स्वतः हून पुढाकार घेत आपल्या मुलींना लसीकरणासाठी रुग्णालयात आणले.

भोकर शहरातील ज्या मुलींचे वय १४ ते १५ वर्षांच्या दरम्यान आहे, त्या मुलींच्या पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. लसीकरणासाठी येताना मुलीचे आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य आहे, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण आणि आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार यांनी केले आहे.

या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती यन्नावार, डॉ. अपर्णा जोशी, डॉ. अविनाश गुंडाळे, इन्चार्ज सिस्टर उज्ज्वला पवार, आरोग्य सेविका मुक्ता गुट्टे, सरस्वती दिवटे, संगीता पंदीलवाड, आरोग्य कर्मचारी नामदेव कंधारे, योगेश पवार, संजय धुमाळे, मारोती गेंदेवाड यांच्यासह रुग्णालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## एमएच-सीईटी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –एमबीए/एमएमएस या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशांसाठी एमबीए/एमएमएस-सीईटी-२०२६ आणि अभियांत्रिक, औषधनिर्माणशास्त्र, बी प्लॅनिंग व कृषी तंत्रज्ञान या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एमएच-सीईटी परीक्षा-२०२६ दोन टप्प्यात नांदेड शहरात ६ ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी ७.३० ते सायं. ६.४५ वाजेपर्यंत व ९ ते १९ मे २०२६ या कालावधीत सकाळी ७.३० ते सायं ६.४५ या वेळेत ३ परीक्षा केंद्रावर घेण्यात येत आहे.

परीक्षा केंद्राच्या परिसरात बाहेरील व्यक्तींचा उपद्रव होऊ नये व परीक्षा स्वच्छ सुसंगत पार पाडण्याच्यादृष्टीने या परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी काढले आहेत.

ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ पंचशीलनगर, तिरुमला हॉस्पीटल, छत्रपती चौक नांदेड, शासकीय तंत्रनिकेतन वीर सावरकर मार्ग बाबानगर नांदेड, श्री संभाजी कॉलेज ऑफ प्रायमरी, शामल एज्युकेशन कॅम्प देगाव रोड पो. नांदला डिग्रस खडकुत या ३ या परीक्षा केंद्रांपासून १०० मीटर परिसरात दि. ६ ते २६ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी ७.३० ते ६.४५ वाजेपर्यंत व ९ ते १९ मे २०२६ पर्यंत सकाळी ७.३० ते सायं. ६.४५ वाजेपर्यतच्या कालावधीत सकाळी ६ ते रात्री ७ वाजेपर्यंत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला कॅलक्युलेटर, ट्रान्झिस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मीटरपर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रास नेण्यास, त्याचप्रमाणे परीक्षा कालावधीत या परिसरात १०० मीटरपर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

# लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक सुशोभिकरणाच्या कामाला गती

## आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नांना यश

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा नगर पालिकेत सत्तांतर झाल्यानंतर शहराच्या विकासात भर पडत आहे. जुन्या शहरात जामा मस्जिद ते पूल असा सिमेंट रस्ता तयार झाला आहे. तसेच विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या संकल्पनेतील बुद्ध विहाराचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्वामी समर्थ मंदिर परिसरात एक कोटीचे नमो उद्यान साकारत आहे. शहरात प्रवेश करताना छत्रपती शिवाजी महाराज मुख्य चौक अतिशय आकर्षक व प्रशस्त होत असून, तेथे भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. काम पूर्णत्वास गेल्यानंतर शहराच्या वैभवात भर पडणार असल्याचे बोलले जात आहे.



लोहा शहरात सत्तांतर झाल्यानंतर नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख व टीमने स्वच्छ, सुंदर शहर हा उपक्रम हाती घेतला. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नगरपालिकेत पार पडलेल्या अधिकाऱ्यांच्या पहिल्याच बैठकीत लोहा शहरात दुकानाच्या समोर बॅनर लावू नये अशी सक्त ताकीद दिली होती.

शिवजयंती निमित्ताने नगराध्यक्ष शरद पवार व टीमने शिवप्रेमींना आवाहन केले. तसेच बॅनर ऐवजी पुस्तके द्या, हा उपक्रम राबविला. त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त बॅनर लावताना नगरपालिकेने नेमून दिलेल्या जागेवर बॅनर लावावे. सामाजिक व विधायक उपक्रम राबवावेत, असे आवाहन नगराध्यक्ष शरद पवार व टीमच्या वतीने करण्यात आले आहे.

जुना लोहा शहरात जाणारा रस्ता उत्कृष्ट झाला आहे. लवकरच सार्वजनिक शौचालय उभारण्याचे काम पूर्णत्वास जाईल. आ. चिखलीकर यांनी नेहमीच शहराच्या विकासासाठी निधी दिला आहे. युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्त्वाखाली नगराध्यक्ष शरद पाटील व टीम चांगले काम करीत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकारण अंतिम टप्प्यात आहे तर जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, असे पत्र आ. चिखलीकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्यासमोर चौक आहे. या चौकाचे सुशोभिकरण ४० लक्ष रुपये खर्चून केले जात आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर शहराच्या वैभवात भर टाकणारा सुंदर आकर्षक चौक उभा राहील, शिवाय दिव्यांच्या उजेडाने हा परिसर न्हाळून निघणार आहे.

## माया सूर्यवंशी यांची जालना येथे वरिष्ठ लेखापाल म्हणून पदोन्नती

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –जिल्हा कोषागार कार्यालयात कार्यरत असलेल्या सौ. माया संभाजी सूर्यवंशी यांची वरिष्ठ लेखापाल म्हणून जालना येथे पदोन्नती झाली आहे.



लेखा, कोषागार विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार त्यांची जालना जिल्हाधिकारी कार्यालय (अंतर्गत लेखापरीक्षण विभाग) येथे वरिष्ठ लेखापाल म्हणून पदस्थापना करण्यात आली आहे.

सौ. माया सूर्यवंशी यांनी शासनाच्या कोषागार विभागात कर्तव्यदक्ष, प्रामाणिक व शिस्तबद्ध सेवा बजावत प्रशासकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आर्थिक कामकाजातील अचूकता, जबाबदारीची जाणीव आणि कार्यालयीन कामकाजातील सातत्यपूर्ण योगदान याची दखल घेत पदोन्नती करण्यात आली आहे. त्यांनी केलेल्या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दखल घेतली आहे. वरिष्ठ लेखापाल म्हणून सौ. माया सूर्यवंशी यांची पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्ह्यात आज 'जागतिक आरोग्य दिन' होणार साजरा –जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख

**नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ७ एप्रिल हा दिवस 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून संपूर्ण नांदेड जिल्ह्यात साजरा करण्यात येणार आहे. यावर्षी जागतिक आरोग्य दिनासाठी Together for health. Stand with science आणि मराठीत एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठी! हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे.

या दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यात माझे गाव आरोग्य संपन्न गाव या संकल्पनेवर आधारित विविध आरोग्य कार्यक्रम आणि शिक्षण उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

**जिल्ह्यात राबविले जाणारे प्रमुख उपक्रम**

जिल्हा परिषद आरोग्य विभाग आणि जिल्हा रुग्णालय प्रशासनामार्फत खालील उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

**आरोग्य प्रभात फेरी व आरोग्य दिंडी :** गावागावांतून आरोग्याचा संदेश देण्यासाठी प्रभात फेऱ्या काढण्यात येतील. **चर्चासत्रे व जनजागृती :** आरोग्य विषयावर तज्ज्ञांची चर्चासत्रे आणि जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातील.

**आरोग्य शिबिरे :** नागरिकांच्या तपासणीसाठी विविध ठिकाणी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येईल.

**ग्रामपातळीवर उपक्रम :** ग्रामपंचायतींमध्ये 'आरोग्य सभा' घेऊन समुदाय आधारित गटचर्चा व समुपदेशनावर भर दिला जाईल.

**प्रचार-प्रसिद्धी :** सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्र लेख आणि यशोगाथांच्या माध्यमातून आरोग्य योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यात येईल.

उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार जिल्ह्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांचे जिल्ह्यात प्रभावी नियोजन करण्यात येत आहे. माझे गाव आरोग्य संपन्न गाव ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

# माहूरमध्ये भाविकांच्या गर्दीनंतर स्वच्छता मोहीम

**माहूर (प्रतिनिधी)** –दत्त शिखर संस्थानचे महंत मालक यांच्या अंतिम दर्शन व निरोप विधीसाठी रविवारी माहूर गडावर हजारो भाविकांची अभूतपूर्व गर्दी उसळली होती. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या भाविकांमुळे संपूर्ण परिसरात मोठी वर्दळ पाहायला मिळाली. या प्रचंड गर्दीमुळे परिसरात स्वच्छतेचे मोठे आव्हान निर्माण झाले होते.



या पार्श्वभूमीवर माहूर नगरपंचायतने तत्काळ पुढाकार घेत सोमवार, दि. ६ मार्च रोजी सकाळी दत्त शिखर परिसर व पायथा येथे व्यापक स्वच्छता मोहीम राबवली. नगराध्यक्ष फिरोज दोसानी व मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम प्रभावीपणे पार पडली.

विशेष म्हणजे या स्वच्छता मोहिमेत नगराध्यक्ष, फिरोज दोसांनी नगरसेवक व त्यांच्या प्रतिनिधींनी स्वतः स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत प्रत्यक्ष मैदानात उतरून सहभाग नोंदवला. गड परिसर, पायथा, मुख्य रस्ते तसेच भाविकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी सखोल स्वच्छता करण्यात आली.

कचऱ्याचे ढीग हटवणे, प्लास्टिक व इतर टाकाऊ वस्तूंची विल्हेवाट लावणे यावर विशेष भर देण्यात आला. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी अल्पावधीत मोठे काम पूर्ण करत संपूर्ण परिसर पूर्ववत स्वच्छ केला.

नगर पंचायतच्या या तत्पर, जबाबदार आणि सेवाभावी भूमिकेमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, स्वच्छतेच्या या आदर्श उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बैसाखीनिमित्त महान धार्मिक गुरमत समागम

## ज्ञानी जंगसिंघजी कथाकार आणि सुफी संत गुलाम हैदर कादरी यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– खालसा पंथ सृजना दिवस बैसाखी पर्वास समर्पित महान धार्मिक गुरमत समागम आणि रैनसभाई कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती येथील भुजंगी सेवक जत्था श्री हजुरसाहिब यांच्यावतीने देण्यात आली आहे. येत्या १४ एप्रिल रोजी खालसा पंथाचा सण बैसाखी साजरा होत आहे.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही बैसाखी सणाला समर्पित असे सात दिवसीय समारोहाचे आयोजन शहीदपुरा गुरुद्वारा गेट नंबर ५ भागात करण्यात आले आहे. गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघ आणि पंजप्यारे साहिबान, तसेच संतबाबा नरिंदर सिंघ कारसेवावाले, संतबाबा बलविंदर सिंघ करसेवावाले, संतबाबा तेजसिंघ मातासाहेबवाले व संत महात्माँच्या आशीर्वादाने कार्यक्रमाची आखणी करण्यात येत आहे.

सोबतच हजुरी साधसंगत आणि सेवाभावी युवकांचे सहकार्य लाभत आहे, असे प्रतिपादन भुजंगी सेवक जत्था संघटनाचे सरदार हरजिंदरसिंघ सुखाई यांनी केले. या कार्यक्रमात श्री मिशल शाहिदा तरणा दल बाबा बकाला साहिब येथील ज्ञानी जंगसिंघ, बरनाला पंजाब येथील सुफी संत गुलाम हैदर अली कादरी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय हजूरी रागी भाई गुरप्रीतसिंघ, रागी भाई जरनैल सिंघ नूर आणि रागी भाई तेजवंत सिंघ यांचे प्रतिदिन रात्रीच्या वेळी कीर्तन होणार आहे. दि. ११ एप्रिल रोजी रैनसभाई कीर्तन दरबार कार्यक्रम होईल. कार्यक्रमाचे समापन दि. १४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी होईल, असे सांगण्यात आले आहे.

या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्यने उपस्थित राहावे, असे आवाहन भुजंगी सेवक जत्थातर्फे करण्यात आले आहे.

# हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसाद



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील पारेकर गल्लीतील मारोती मंदिरात दि. २ मार्च रोजी भंडाऱ्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या भंडाऱ्याचा प्रसाद भाविकांनी उत्स्फुर्तपणे घेतला.

लोहा शहरातील पारेकर गल्लीतील मारोती मंदिरात दि. २ मार्च रोजी श्री हनुमान (मारोती) जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महारूद्र मारोतीची महाआरती करण्यात आली. त्यानंतर भंडाऱ्याचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानिमित्ताने अनेक भाविक-भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

याप्रसंगी नगरसेविका सौ. गितांजलीताई सोनू संगेवार, भूषण दमकोंडवार, गजानन कळसकर, रामभाऊ वाले, मारोतराव कळसकर, दिगांबर मार्कडकर, नरेश महामुने, गिरिश गुंजकर, सोमनाथ शिराळे, अथर्व खपले, प्रज्वल वाले, अनिल सनपूरकर यांच्यासह मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.

# गृहनिर्माण संस्था रद्द झाल्यानंतरही विक्री व्यवहार प्रकरण महसूल मंत्र्यांच्या दालनात; लवकरच होणार पर्दाफाश

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील धनेगाव/मुजामपेठ अंतर्गत सर्वे नं. १२१ प्लॉट क्र.३६८ ची जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरामपूर या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झाली असताना दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दस्त क्र. १७४१/२०२६ दुय्यम निबंधक नांदेड -१ येथे बोगस चेअरमन बनून कन्व्हेन्स डीड करणारे व विक्री करणारे व खरेदीदार यांच्यावर प्लॉटधारकाची फसवणूक, शासनाची फसवणूक केल्यामुळे सखोल चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी माधव उमाजी झुरेकर यांनी केली होती. मात्र यात संबंधित विभागाने कारवाई केली नसल्याने हे प्रकरण आता थेट महसूल मंत्र्यांच्या दालनात पोहोचले आहे.

या प्रकरणाची सविस्तर चौकशी झाल्यास मोठा भ्रष्टाचार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अर्जदार हा रा. कुपटी (बु) पो. इस्लापूर ता. किनवट येथील रहिवासी असून, रोजमजुरी करून आपल्या कुटुंबियांसह राहतो. हनुमान सोसायटी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था मर्यादित बळीरामपूर/धनेगाव ता. जि. नांदेडचे तत्कालीन प्रथम चेअरमन, लिपीक, सह जिल्हा निबंधक विसावानगर या दोघांनी मिळून पुणे येथील इंडस टॉवर लि. कार्यालय न.२१० ई-कोरमारवल विमाननगर पुणे ४११०१४ (महाराष्ट्र) या कंपनीने तक्रारदार यांच्या वडिलाच्या प्लॉटवर खोदकाम केल्याची माहिती मिळाली म्हणून त्यांनी दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस अधीक्षक नांदेड यांना तक्रार दिली आणि लगेच वकीलामार्फत कोर्टात दाद मागितली.

यामधील दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी तक्रार अर्जातील सय्यद महेमूद सय्यद अहेमद साब यांची पत्नी, यांनी जय हनुमान मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था म. बळीरमपूर / धनेगाव या संस्थेची नोंदणी सन २०१७ मध्ये रद्द झालेली असतांना दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुय्यम निबंधक नांदेड-१ येथे दस्त क्र.१७४१ / २०२६ रोजी कन्व्हेन्स डीड केली. या प्रकरणात गुंतलेल्या गैर अर्जदारांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर अर्जदार व शासनाच्या फसवणुकीबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून चौकशी केली तर मोठा भूखंड घोटाळ्याचा प्रकार पुढे येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# नांदेड मर्चंट बँक सिडको शाखेचा वर्धापनदिन उत्साहात साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड मर्चंटस बँक सिडको शाखेचा ३८ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने व्हाईस चेअरमन अरुण चालीकवार, संचालक दीपक चन्नावार, गोवर्धन बियाणी यांच्यासह ज्येष्ठ सभासद, खातेदार, अल्प ठेव यांनी शाखेतील अधिकारी, कर्मचारी यांना शुभेच्छा देऊन सत्कार केला.

नांदेड मर्चंट बँक शाखा सिडकोने वर्धापनदिनानिमित्त पूजा व अल्प फराळ व्यवस्था केली होती. यावेळी ज्येष्ठ सभासद सुभाष बोनगुलवार, रंगारी, स्वप्नील ढवळे यांच्यासह पत्रकार रमेश ठाकूर, सारंग नेरलकर यांनी शाखा व्यवस्थापक गंगाधर कांबळे, लेखापाल राजेंद्र शर्मा, रोखपाल अंबादास कठारे, लिपीक विना सावरगावकर, रामेश्वरी राखेवार व कर्मचारी श्रीनिवास शर्मा, दत्तात्रय नगनुरवार यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

गेल्या अनेक वर्षांत शाखेने ठेव वाढ, कर्ज परत फेड, उद्दिष्टपुर्तीकडे वाटचाल केली असून, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने सभासद, खातेदार, अल्पठेवमध्ये आपुलकी निर्माण झाली आहे.

# सिंचन नगरच्या हनुमान मंदिर प्रांगणात लवकरच सभा मंडप -आ. कल्याणकर

**नांदेड (प्रतिनिधी)**– उत्तर नांदेडमध्ये अनेक नगर, उपनगरातील देवस्थान प्रांगणात सभा मंडपाचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आले आहे. मात्र सिंचन नगर येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिराच्या सभा मंडपाचे काम शिल्लक आहे. येत्या काळात लवकरच या ठिकाणी सभा मंडपासाठी निधी देऊन ते सभा मंडपाचे काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन उत्तर नांदेडचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी दिले.



हनुमान जयंतीनिमित्त सिंचन नगर येथील ग्रामस्थ व नित्य योग सेवा समितीच्या पुढाकाराने दक्षिणमुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, मनपाच्या नगरसेविका श्रीमती सरस्वती राऊत, नगरसेवक योगेश मुंडे, नगरसेवक सुहास कल्याणकर, भाजपाचे युवा नेते किशनराव कल्याणकर, योगाचार्य सीताराम सोनटक्के, ज्येष्ठ पत्रकार मकरंद पांगरकर, प्रल्हाद आयनेले आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. कल्याणकर म्हणाले की, मतदारसंघातील अनेक नगर, उपनगरात देवस्थान प्रांगणात सभा मंडपासाठी निधी उपलब्ध करून सभा मंडपाचे काम पूर्ण केले आहे. केवळ आपल्या सिंचन नगरातीलच दक्षिणमुखी हनुमान मंदिर प्रांगणात सभा मंडपाचे काम बाकी आहे. येत्या काळात या ठिकाणी सभा मंडपाचे काम निधी उपलब्ध करून पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन आ. कल्याणकरय यांनी दिले.

यावेळी आ. कल्याणकर यांनी हनुमान जयंतीच्या सर्व उपस्थित भक्तांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नित्य योग सेवा समितीचे योगाचार्य सीताराम सोनटक्के, बाळकृष्ण पसलवाड, ओमप्रकाश पोद्दार, लक्ष्मण मामीडवार, पंकज आयनेले, जी. आर. इंगोले, कृष्णा काळे, बोंढे, ॲड. पांडे, विनायक बाराहत्ते, शिवाजी टाक, महेश सोनवणे, कृष्णा केदारे, कृष्णा घोलपजी, काळबा भोसले, पंकज चव्हाण, सोपान कदम, दिगंबर कल्याणे, शेलातुरे तेवर, अनिल राठोड, किरण मुत्तेमवार, वानखेडे, कौशल्य, केंद्रे, शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# सुमन बालगृहात मौखिक आरोग्य शिबीर संपन्न; २६ विद्यार्थिनींची तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील सुमन बालगृहात शासकीय रुग्णालयाच्या वतीने मौखिक आरोग्य शिबीर घेण्यात आले. यावेळी बालगृहातील सर्व विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करण्यात आली.

दि. २० मार्च ते २० एप्रिल हा महिना मौखिक आरोग्य महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचा भाग म्हणून गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, निवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम बुट्टे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राष्ट्रपाल औसारे यांच्या मार्गदर्शनाखाली दंत शल्य चिकित्सक डॉ. कांतीलाल इंगळे व दंत महाविद्यालय नांदेड येथील डॉ. राजेश कुमार, डॉ. स्नेहल चिंतळे यांनी सुमन बालगृह येथे मोखिक आरोग्य शिबीर आयोजित केले होते.



या शिबिरात एकूण २६ विद्यार्थिनींची तपासणी करून उपचार करण्यात आले. मौखिक आरोग्य शिक्षण, दंत स्वच्छ करण्याची योग्य पद्धत, हात धुण्याची योग्य पद्धत याचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. तसेच विद्यार्थिनीना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी दंत महाविद्यालयाचे अंतरवासीता डॉक्टर्स व दत्ता जाधव, विशाल पाटील यांनी परिश्रम घेतले.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

# शास्त्रीय पद्धतीने करा कांदा बीजोत्पादन



## पीक संरक्षण

- » कांदा बीजोत्पादनाच्या पिकावर फुलकिडे आणि लाल कोळी यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होतो. कांदा लागवडीवेळी हेक्टरी ३५ किलो कार्बोफ्युरान मातीत मिसळल्यास सुमारे एक महिन्यापर्यंत पिकाचे किडीपासून संरक्षण होते. त्यानंतर गरजेनुसार दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने डायमिथोएट १ मि.ली., प्रोफेनोफॉस १.५ मि.लि. किंवा सायपरमेथ्रीन १ मि.लि. प्रति लिटर पाणी चिकट द्रव्यासोबत मिसळून आलटून-पालटून फवारावीत.
- » जांभळा करपा आणि तपकिरी करपा या बुरशीजन्य तसेच आयरिश येलो स्पॉट व्हायरस आणि ॲस्टर येलो ड्वार्फ व्हायरस या विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव होत असतो. रोगांच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम २ ग्रॅम किंवा क्लोरोथॅलोनिल २ ग्रॅम किंवा मॅन्कोझेब ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे रोगाच्या तीव्रतेनुसार दर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे.
- » रोग आणि किडीच्या बंदोबस्ताकरिता बुरशीनाशक आणि कीटकनाशक यांची एकत्र फवारणी करावी. ही फवारणी केवळ फुले उमलेपर्यंतच करावी. फुले उमलल्यानंतर फवारणी करू नये. अन्यथा, मधमाश्यांचा वावर कमी होऊन परागसिंचन आणि फलधारणेवर विपरीत परिणाम होतो.

**बहुतांश बीज उत्पादन कंपन्या कांदा बीजोत्पादनात जास्त रस घेत नाहीत. पर्यायाने शेतकऱ्यांना त्यांचे स्वतःचे बी तयार करून घ्यावे लागते. या बीजोत्पादनामध्ये शास्त्रीय बाजू योग्य प्रमाणे पाळणे गरजेचे असते. कांदा बीजोत्पादनातील शास्त्रीय बाजू या लेखातून समजून घेऊ...**

## उत्तम व मागणी असलेल्या जातीची निवड

कांद्यांमध्ये हंगाम आणि रंगानुसार अनेक जाती आहेत. कांदा व लसूण संशोधन संचालनालयाने भीमा डार्क रेड, भीमा रेड, भीमा राज, भीमा सुपर, भीमा शक्ती, भीमा किरण, भीमा लाईट रेड, भीमा शुभ्रा, भीमा श्वेता आणि भीमा सफेद अशा दहा जाती विकसित केल्या आहेत. बीजोत्पादनासाठी उत्तम प्रतीच्या कांद्यांची निवड करणे आवश्यक असते. अनेकदा चांगले कांदे बाजारात विकले जातात आणि खराब कांदे बीजोत्पादनासाठी वापरले जातात. त्यामुळे कांद्याच्या नवीन पिढीमध्ये अनेक वैगुण्ये वाढतात. चांगला वाण टिकवून ठेवणे, सुधारणा करण्याच्या दृष्टीने बियाण्यासाठी चांगल्या कंदाची लागवड करावी.



## हवामान आणि जमीन

कांदा पीक हे बीजोत्पादनाच्या दृष्टीने तापमानास अत्यंत संवेदनशील आहे. पराग सिंचनाच्या काळात तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या पुढे वाढले, तर मधमाश्यांचा वावर कमी होऊन बीजोत्पादन कमी होते. बीजोत्पादनासाठी स्वच्छ सूर्यप्रकाशसुद्धा आवश्यक असतो. ढगाळ हवामान किंवा पाऊस यामुळे रोगांचे प्रमाण वाढते. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि कोरडे हवामान यामुळे फलधारणा चांगली होते. मध्यम ते भारी जमिनीत कांदा बीजोत्पादन चांगले होते. जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. चोपण किंवा क्षारयुक्त जमिनीत उत्पादन चांगले येत नाही. हलक्या किंवा मुरमाड जमिनीत बीजोत्पादन घेऊ नये. अशा जमिनीत फुलांचे दांडे कमी निघतात आणि बी कमी तयार होते.

## मातृकांद्यांची निवड आणि लागवड

मातृकांद्याच्या निवडीवरच तयार होणाऱ्या बीजाची शुद्धता आणि गुणवत्ता अवलंबून असते. चपटे किंवा जाड मानेचे कांदे लागवडीकरिता निवडू नये. कांद्याचा रंग आकर्षक आणि एकसारखा असावा. कांदे गोल, मध्यम किंवा मोठ्या आकाराचे असावेत. सर्वसाधारणपणे मध्यम आकाराचे (वजन ७० ते ८० ग्रॅमच्या दरम्यान, व्यास ४.५ ते ६ सें.मी.) कांदे वापरले, तर हेक्टरी २५ ते ३० क्विंटल कांदे बियाणे म्हणून लागतात. शक्यतोवर एका डोळ्याचे कांदे निवडावेत. निवडलेले कांदे चांगले सुकलेले असावेत. सालपट निघालेले, काजळी आलेले, कोंब आलेले किंवा सडलेले कांदे निवडू नयेत. प्रत्येक कांद्याचा वरचा एक तृतीयांश भाग कापून काढावा. कापून तयार केलेले कांदे कार्बोसल्फान २ मि.लि. आणि कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या द्रावणात अर्धा तास बुडवून नंतर लावावेत. सरी वरंब्यावर लागवड करताना ४५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. सरीच्या एका बाजूवर ३० सें. मी. अंतरावर कांदे लावावेत. कंद मातीमध्ये पूर्ण झाकावेत. ठिबक सिंचनावर लागवड करावयाची झाल्यास ५० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. दोन सरींच्या तळाशी २० सें.मी. अंतरावर कांदे ठेवावेत. एक सर मोकळी सोडावी. कांदे ठेवलेल्या सरीचा माथा सपाट करावा. त्यामुळे सरींच्या तळाशी ठेवलेले कांदे मातीने चांगले झाकून जातात. शिवाय ठिबक सिंचनाच्या नळ्या पसरवण्यास सपाट जागा तयार होते. एका जोड ओळीसाठी एक ठिबक सिंचनाची नळी वापरता येते.

## विलगीकरण आणि पूरक पराग सिंचन

कांदा पिकात परपरागीभवनाद्वारे फलधारणा होते. मधमाश्या मध आणि पराग कण गोळा करण्यासाठी एका फुलावरून दुसऱ्या फुलांवर भ्रमण करत सुमारे दीड कि.मी. परिसरात फिरतात. त्यामुळे बीजोत्पादनासाठी दोन जाती दीड कि.मी.च्या आत लावल्या, तर परपरागीभवन होऊन जातींची शुद्धता राहत नाही. बियाण्यांमध्ये भेसळ होऊ नये आणि गुणवत्ता टिकून राहावी म्हणून कांदा बीजोत्पादनासाठी किमान दीड कि.मी. विलगीकरण अंतर राखणे आवश्यक आहे. फुले उमलल्यानंतर नैसर्गिकरीत्या मधमाश्या फुलांवर येऊ लागतात. मात्र जंगलतोड आणि कीटकनाशकांच्या वाढत्या वापरामुळे मधमाश्यांची कमतरता जाणवत असल्यास एकरी दोन ते तीन मधमाशी पेट्या शेतात फुले उमलल्यानंतर ठेवाव्यात. शेतात मधमाश्यांची संख्या व कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी कांद्याची फुले उमलल्यानंतर कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करू नये.

## संतुलित खत व्यवस्थापन

लागवडीच्या २० दिवस आधी २५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत पसरवून नांगरट करावी. याच बरोबर १०० कि.ग्रॅ. नत्र, ५० कि.ग्रॅ. स्फुरद, ५० कि.ग्रॅ. पालाश आणि ५० कि.ग्रॅ. गंधक यांची शिफारस आहे. कांदा लागवडीआधी स्फुरद, पालाश आणि गंधक यांच्या पूर्ण आणि नत्राची निम्मी मात्रा द्यावी. उरलेले ५० कि.ग्रॅ. नत्र दोन भागांत विभागून द्यावे. पहिला भाग कंद लावल्यानंतर ३० दिवसांनी, तर दुसरा भाग लागवडीनंतर ५० दिवसांनी द्यावा. कांदा पिकास तांबे, लोह, जस्त, मँगेनीज, बोरॉन आदी सूक्ष्म द्रव्यांची गरज असते. सूक्ष्म द्रव्यांच्या कमतरतेची ओळख पटल्यानंतरच त्यांची सल्फेटच्या रूपात १ ग्रॅम पावडर प्रति लिटर पाण्यात फवारणी करावी. फवारणी करताना त्यात चिकटद्रव्ये ०.६ मि.लि. प्रति लिटर पाणी या प्रमाणात घालावे. सूक्ष्म द्रव्यांची फवारणी कांदे लावल्यानंतर ५० ते ७० दिवसांच्या दरम्यान करावी. दांड्यावरील फुले उमलल्यानंतर फवारणी करू नये.

## पाणी नियोजन

बीजोत्पादनासाठी कांदे लावल्यानंतर पहिले पाणी हलके द्यावे. पहिल्या पाण्यानंतर लगेच कोंब फुटून निघतात. उघडे पडलेले कांदे मातीने झाकून घ्यावेत आणि दुसरे पाणी द्यावे. कांदा बीजोत्पादन सर्वसाधारणपणे मध्यम ते भारी जमिनीत घेत असल्यामुळे दोन पाळ्यांमधील अंतर ८ ते १० दिवस ठेवावे. प्रत्येक पाळीत नेहमी हलके पाणी द्यावे. कांदा पिकाची मुळे १५ ते २० सें.मी. खोल जातात. तेवढाच भाग ओला राहील इतकेच पाणी देणे गरजेचे असते. पाणी जास्त झाले तर कंद सडतात. हलक्या जमिनीत पाणी ६ ते ८ दिवसांच्या अंतराने द्यावे. पाणी कमी पडल्यास बी वजनाने हलके राहते आणि त्याची उगवणक्षमता कमी होते. ठिबक सिंचनावर बीजोत्पादन उत्तम येते. एक मीटर अंतरावर ठिबक सिंचनाच्या नळ्या पसरवून नळीच्या दोन्ही बाजूंनी कांदा लागवड करून पाणी देता येते. ठिबक सिंचनामुळे पाण्याची ३० ते ३५ टक्के बचत होते, पाणी देणे सुलभ होते, शिवाय तणांचे प्रमाण सुद्धा कमी राहते.



## तण व्यवस्थापन

कांदा बीजोत्पादन पिकात तणांचा बंदोबस्त करणे मोठे जिकिरीचे काम असते. विशेषतः फुलांचे दांडे निघाल्यानंतर खुरपणी करतेवेळी फुलांच्या दांड्याची मोडतोड होऊन नुकसान होते. फूल येईपर्यंत एक खुरपणी करता येते. कांदे लावल्यानंतर साधारणपणे ४५ दिवसांनी खुरपणी करावी. तणांच्या बंदोबस्तासाठी पेंडीमिथॅलीन ३ मि.लि. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारावे आणि लगेच पाणी द्यावे. पाणी देण्यास ३-४ तासांपेक्षा जास्त उशीर झाल्यास तणनाशकाची परिणामकारकता कमी होते. तणनाशकाचा परिणाम साधारणपणे ४५ दिवसांपर्यंत राहतो. त्यानंतर पाण्यासोबत किंवा हवेसोबत वाहून येणारे गवताचे बी रुजू लागते आणि तण परत वाढते. अशा वेळी ४५ दिवसांनी दुसऱ्यांदा पेंडीमिथॅलीनची फवारणी केली, तर तणाचा उपद्रव बराच कमी करता येतो.

## काढणी आणि सुकवण

कांद्याच्या गोंड्यातील सर्व बी एकाचवेळी पक्व होत नाही. बियांचे गोंडे काढणीला आल्यावर त्यांचा रंग तपकिरी होतो आणि बियांचे वरचे आवरण फाटून त्यात काळपट बी दिसू लागते. सामान्यतः ३ ते ४ वेळा गोंड्यांची काढणी हाताने करावी लागते. काढणी सकाळी वातावरणात आर्द्रता असताना करावी. गोंड्यावर हलकासा ओलसरपणा असल्याने बी गळून पडण्याची भीती कमी राहते. गोंडे ओढून न काढता खुडून काढावेत. गोंडे काढल्यानंतर ताडपत्रीवर पसरवून ५ ते ६ दिवस उन्हात चांगले सुकवून घ्यावे. चांगल्या सुकलेल्या गोंड्यातून बी काठीने हळूहळू मारून वेगळे करावे. त्यानंतर उफणनी करून बी स्वच्छ करावे. हलके, फुटलेले, पोचट बी चाळणीच्या साह्याने किंवा प्रतवारी यंत्राने वेगळे करून उत्तम प्रतीचे बियाणे एकत्र करावे.

## अशी करा साठवण

मळणी केलेल्या बियांत १० ते १२ टक्के आर्द्रता असते. स्वच्छतेनंतर पुन्हा पातळ पसरवून सुकू द्यावे. साठवणीसाठी बियांमध्ये ६ ते ७ टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रता नसावी. असे बियाणे एक ते दीड वर्ष टिकते. कांदा बी जास्त दिवस साठवून ठेवण्यासाठी आर्द्रतारोधक पिशव्यांचा वापर करावा. सर्वसाधारणपणे ४०० गेजच्या पॉलिथिन पिशव्यांमध्ये बी वाळवून भरले, तर ते जास्त दिवस टिकू शकते.

# शास्त्रीय पद्धतीने धान्य साठवणूक



**आपल्याकडे साठवलेल्या धान्याचे किडीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. धान्य साठवणुकीत होणाऱ्या नुकसानीपैकी मुख्य नुकसान किडी आणि उंदरामुळे होते. किडींच्या प्रादुर्भावाची सुरुवात कणसांवर किडींनी दिलेल्या अंड्यापासून, खळ्यापासून, साठविलेल्या जुन्या धान्यापासून, वाहनाद्वारे आणि पोत्यातून होतो. या मध्ये प्रामुख्याने भुंगे वर्गीय व पतंग वर्गीय किडींचा समावेश होतो. या किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नियोजनबद्ध व्यवस्थापन केल्यास कमी वेळेत आणि कमी खर्चात प्रभावीपणे नियंत्रण होते.**

## भुंगेवर्गीय किडी

- » सोंडे : ही कीड गहू, मका, ज्वारी, तांदूळ इत्यादी तृणधान्यातील प्रमुख कीड आहे. किडींचा प्रौढ (सोंडा) आणि अळी दाणे पोखरून नुकसान करते. प्रौढ गर्द तपकिरी किंवा काळा असून त्याचे तोंड लांबट निमुळते असते. त्याला सोंड असे म्हणतात. सोंड्याची लांबी १ ते ३ मिमी असते. अळी काळसर किंवा पांढऱ्या रंगाची असून, पाठीवर चार फिक्कट पिवळे पट्टे असतात. किडीचा जीवनक्रम एक ते दीड महिन्यात पूर्ण होतो. या किडीचा प्रादुर्भाव शेतातून म्हणजेच पक्व होणाऱ्या दाण्यातून सुरू होतो.
- » खपरा भुंगा : ही कीड प्रामुख्याने साठवलेल्या गव्हात आढळते. या किडीची अळी दाण्याचे नुकसान करून बियाण्याचा अंकुर खाते. त्यामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते. प्रौढ २ ते ३ मिमी लांब असून त्याचा रंग पांढुरका बदामी असतो. अंगावर लालसर केसाचे झुपके असतात. किडीचा जीवनक्रम २ ते ९ महिन्यांत पूर्ण होतो.
- » कडधान्यावरील भुंगेरा : ही कीड मुख्यतः तूर, मूग, उडीद, चवळी, हरभरा इत्यादी कडधान्यामध्ये आढळते. या भुंगेऱ्याची अळी दाणे पोखरून उपजीविका करते. भुंगेरे ४.५ मिमी लांब असून हृदयासारख्या आकाराचे असतात. भुंगेऱ्याच्या पाठीवरील मध्यभागी दोन फिक्कट पांढरे ठिपके असतात. ही कीड २५ ते ४० दिवसांत आपला जीवनक्रम पूर्ण करते. किडीचा प्रादुर्भाव शेतातून सुरू होत असल्याने साठविलेले कडधान्य आणि बियाण्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.
- » दातेरी भुंगा : ही कीड गहू, बाजरी, इत्यादी तृणधान्यांचे फुटके दाणे व पिठावर जागते. प्रौढ किडीच्या शरीरावर दोन्ही बाजूंनी दाता सारखी रांग असून हिचा रंग पांढरा असतो. ही कीड ४० ते १२० दिवसात आपला जीवनक्रम पूर्ण करते.

## पतंगवर्गीय किडी

- » दाण्यावरील पतंग : ही कीड प्रामुख्याने भात, ज्वारी तर कधी कधी गव्हात आढळते. या किडीचा रंग पिवळसर तपकिरी, पंख लांबट व लांबी १ ते २ सेंमी. असते. अळीचे डोके पिवळे असून रंग पांढुरका असतो. अळी दाण्यात राहून धान्य पोखरते. या किडीचा प्रादुर्भाव शेतातून होतो. किडीचा जीवनक्रम ४ ते ५ आठवड्यांत पूर्ण होतो.
- » तांदळावरील सुरसा/पतंग : या किडीचा प्रौढ करड्या तपकिरी रंगाचा असून लांबी २ ते ३ सेंमी असते. पूर्ण वाढ झालेली अळी मळकट पांढऱ्या रंगाची असते. सुरुवातीस लहान अळी फुटके दाणे व पीठ खाते. मोठी अळी अखंड दाण्याचे भक्षण करते. ही अळी तोंडाद्वारे धागे काढून फुटके दाणे किंवा पिठाच्या भोवती जाळे तयार करून त्यातच कोषावस्थेत जाते. किडीचा जीवनक्रम ६० ते ८० दिवसांत पूर्ण होतो. ही कीड तांदूळ, ज्वारी, बाजरी, पीठ, रवा, मैदा इत्यादीवर उपजीविका करून नुकसान करते.
- » कोळी : कोळी ओल्या धान्यावर उपजीविका करतो. याच्या प्रादुर्भावामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते.

## साठवणुकीतील धान्याचे संरक्षण

बियाणे मळणी करण्यासाठीचे खळे कोठारपासून लांब अंतरावर असावे. बियाणे साठवणुकीपूर्वी कडक उन्हात वाळवावे. बियाणे साठविण्यापूर्वी रिकामी पोती, कणग्या, साठविण्याची जागा व्यवस्थित साफ करून कीड विरहित करावी. साठवणुकीच्या जागेतील भिंतीचे छिद्रे व भेगा सिमेंटच्या साहाय्याने बुजवून घ्याव्यात. साठवणुकीच्या जागेतील उंदराची बिळे सिमेंटच्या साहाय्याने बुजवून घ्यावीत. खिडक्यांना लोखंडी तारेच्या जाळ्या लावाव्यात. बियाणे साठविण्यासाठी शक्यतो नवीन गोण्या किंवा पोते वापरावे. गोण्या किंवा पोते गरम पाण्यात ५० अंश सेल्सिअस तापमानापेक्षा अधिक १५ मिनिटे भिजवून नंतर सुकवून वापराव्यात. उघड्या धान्यावर कीटकनाशकाची फवारणी करू नये. धान्याची पोते लाकडी फळ्या किंवा बांबूच्या काठ्यावर भिंतीपासून ३ फूट लांब अंतरावर ठेवावेत. साठवणुकीच्या जागेतील परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. पावसाळ्यात बियाणे हवाबंद ठिकाणी ठेवावे. उन्हाळ्यात बियाणे मोकळी हवा मिळेल असे ठेवावे. पावसाचे पाणी साठवणुकीच्या जागेमध्ये येणार नाही याची काळजी घ्यावी. कडुनिंबाचा पाला, बियांची पावडर आणि तेलाचा उपयोग किडींना प्रतिबंधात्मक आणि खाण्यास विरोध करणारा आहे. कडधान्यातील भुंगेऱ्यांच्या नियंत्रणासाठी निंबोळी पावडरीची (५ टक्के) बीज प्रक्रिया उपयुक्त आहे. सोंडे या किडीसाठी हळदीची पावडर ३.२५ ग्रॅम किंवा वेखंड पावडर १० ग्रॅम प्रती किलो बियाणे प्रक्रिया फायदेशीर ठरते. बियाणे साठवणुकीस उत्तम पर्याय म्हणजे धातूच्या पत्र्याच्या कोठ्यांचा वापर करावा.

## धुरीजन्य औषधे

ॲल्युमिनियम फॉस्फाईडच्या ३ ग्रॅम वजनाच्या ३ गोळ्या प्रती टन कोठारातील बियाण्यास किंवा १५० ग्रॅम पावडर १०० घन मिटर जागेसाठी किंवा १० ग्रॅम पाऊच प्रति टन बियाण्यासाठी किंवा १५० ग्रॅम पावडर प्रति १०० घन मिटर जागेसाठी ५ ते ७ दिवस संपर्कात ठेवल्यास किडी नष्ट होतात.

## धान्य आणि बियाणे सुरक्षित साठविण्यासाठी उपाय

- » बियाणे अथवा धान्य उन्हामध्ये वाळवून (ओलावा ८ टक्के पेक्षा कमी) ते हवेशीर साठवावे.
- » धान्य, बियाणे साठविण्यासाठी बांबू किंवा पॉलिथीनच्या तळवटाचा वापर करावा.
- » धान्य आणि बियाणे साठविण्यासाठी आधुनिक हवाबंद कोठ्यांचा वापर करावा.
- » कीड नियंत्रणासाठी धुरीजन्य कीटकनाशकाचा वापर करावा.

## उंदरांच्या नियंत्रणासाठी विषारी आमिष

शेतातील उंदरांच्या नियंत्रणासाठी विषारी आमिषाचा वापर करावा. याकरिता ३८० ग्रॅम भरडलेले गहू, ज्वारी किंवा मका धान्य अधिक १० मिलि गोडेतेल (शेंगदाणा किंवा जवस तेल) अधिक १० ग्रॅम झिंक फॉस्फाइड (८०%) पावडर मडक्यात घालून काडीने चांगले ढवळावे. अशा विषारी आमिषाच्या लहान प्रत्येकी १० ग्रॅमच्या गोळ्या तयार कराव्यात. गोळ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून त्या सीलबंद करून एक प्लॅस्टिकची १० ग्रॅमची आमिषाची पिशवी एका बिळात ठेवावी. शेतामध्ये साधारणतः १० ग्रॅम झिंक फॉस्फाइड पावडरपासून बनविलेले आमिष ४० बिळांना पुरेसे आहे.

## तर लागणार नाही धान्याला कीड, बुरशी...

**धान्याची साठवण करताना योग्य काळजी न घेतल्यास किंडींच्या प्रादुर्भावामुळे धान्याचे नुकसान होऊ शकते. साठवलेल्या धान्यावर सोंडकीडा, छोटे भुंगेरे, खापरा भुंगा, दातेरी भुंगा, कडधान्यातील भुंगा, पतंग, तांबडा भुंगा आदी किडींचा प्रादुर्भाव होऊन नुकसान होऊ शकते.**

नवीन धान्याची एकाचवेळी आवक झाल्याने दर कमी होतात. हे टाळण्यासाठी धान्याला अपेक्षित बाजारभाव मिळावा यासाठी धान्य साठवून ठेवतात. धान्यातील किटक २० ते ४० अंश सेल्सिअस तापमानाच्या कक्षेतच क्रियाशील राहू शकतात. धान्यातील ओलाव्याचे प्रमाण ८ ते १० टक्के पेक्षा जास्त असल्यास किंडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता बऱ्याच प्रमाणात वाढते. काही किटकांचे प्रौढ पिकांच्या पक्व अवस्थेतील दाण्यावर अंडी घालतात. अशा धान्याच्या साठवणीत पोषक हवामान मिळाल्यानंतर अळी बाहेर येते आणि धान्य खाण्यास सुरुवात करते. त्यामुळे धान्य चांगले वाळवून साठवावे.

- » मळणी केल्यानंतर धान्य उन्हामध्ये चांगलं वाळवून घ्यावं. धान्यातील ओलाव्याचं प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असावं. ओलाव्याचं प्रमाण जास्त असल्यास धान्याला कीड लागण्याची शक्यता असते.
- » धान्याची पोती जमिनीवर रचून ठेवू नयेत. जमिनीवर साठविल्यामुळे धान्य जमिनीतील उपलब्ध ओलावा शोषून घेते. परिणामी, धान्य चांगले वाळविलेले असून देखील त्यातील ओलाव्याचे प्रमाण वाढते.
- » धान्य साठवणीपूर्वी त्यातील किडलेले, खराब दाणे चाळून आणि उधळणीद्वारे वेगळे करावेत. धान्य साठवणुकीसाठी आधुनिक हवाबंद कोठ्या वापराव्यात. जेणेकरून धान्याला कीड लागली तरी हवेचा पुरवठा न झाल्यामुळे कीड आपोआपच मारली जाईल.
- » साठवणुकीसाठी वापरलेल्या पारंपरिक कोठार किंवा कणगीला असलेली छिद्रे चुन्याने बुजवून घ्यावीत. साठवणुकीच्या खोलीमध्ये उंदरांनी पाडलेली बिळे काचेचा चुरा भरून नंतर सिमेंटने बंद करावा. जेणेकरून उंदरांना पुन्हा सहजरीत्या बिळे पाडता येणार नाहीत.
- » धान्य साठवणुकीच्या जागी पावसाळ्यात पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी. धान्य साठवणुकीसाठी शक्यतो लोखंडी किंवा धातूपासून बनविलेल्या पत्र्याच्या कोठ्या वापराव्यात.
- » धान्य साठवलेल्या ठिकाणी उंदीर येऊ नये यासाठी दरवाज्याखाली गॅल्व्हनाईज पत्रा बसवून घ्यावा. उंदीर तसंच पक्षांना प्रतिबंध करण्यासाठी खिडक्यांना लोखंडी जाळ्या बसवाव्यात. अशा प्रकारे धान्याची साठवणूक केल्यास धान्याची नासाडी होणार नाही.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५९९००, ९७६७७७९७०१, ९८६०७२७३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## मराठवाड्यात मानवी तस्करीविरोधात जनजागृती

### ❒ ‘सेव्ह अवर सिस्टर’ चळवळ गतिमान

**नांदेड (प्रतिनिधी)** – जगभरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या तीन प्रमुख अवैध व्यापारांपैकी मानवी तस्करी हा अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषय आहे. विशेषतः महिला आणि अल्पवयीन मुलींच्या खरेदी-विक्रीच्या घटनांनी समाजासमोर मोठे आव्हान उभे केले होते. मात्र, आता या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलीस विभागानेही सक्रिय पावले उचलली असून, स्वतंत्र प्रतिबंधक कक्ष स्थापन करून महिला पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नांदेड येथे वर्षा डहाळे या पोलीस अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मानवी तस्करी प्रतिबंधक कार्याला अधिक गती मिळत असल्याचे दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर २००२ साली Save the Children India (एसटीसीआय) च्या माध्यमातून SOS Save Our Sisters (आपल्या बहिणींना वाचवा) ही महत्त्वपूर्ण चळवळ सुरू करण्यात आली होती. या चळवळीची सुरुवात विपुला कादरी यांच्या पुढाकारातून झाली. ग्रामीण भागातील महिला व मुलींची फसवणूक करून त्यांना मुंबई, दिल्ली, कोलकाता यांसारख्या महानगरांमध्ये विक्रीसाठी नेण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले होते.




या अमानुष प्रकारांना आळा घालण्यासाठी आपल्या बहिणींना वाचवा ही चळवळ देशपातळीवर राबविण्यात आली.

मराठवाडा विभागात या चळवळीला मोठा प्रतिसाद मिळाला. २००२ पासून विविध उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि कार्यशाळांच्या माध्यमातून ग्रामीण भागात जागरूकता निर्माण करण्यात आली. या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांमध्ये सतर्कता वाढली आणि अशा प्रकारांमध्ये काही प्रमाणात घट झाल्याचे दिसून आले.

ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव मुंडकर यांनी या चळवळीच्या माध्यमातून केलेल्या कार्याचे परिणाम आजही दिसून येत असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, विपुला कादरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या चळवळीने देशपातळीवर सकारात्मक प्रभाव निर्माण केला. महाराष्ट्रात प्रारंभी सोलापूर येथे सुरू झालेले कार्य आता नांदेड जिल्ह्यातही प्रभावीपणे सुरू असून, पोलीस प्रशासनाच्या सहकार्यामुळे या उपक्रमाला अधिक बळ मिळाले आहे. या चळवळीत अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि संस्थांचा सक्रिय सहभाग राहिला. त्यामध्ये गोविंदराव मुंडकर, व्यंकटराव पांडवे, सय्यद मोहियोद्दीन, मारुती वड्डे, बाबुराव उप्पलवार आदींचा समावेश होता. त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून गावागावांत जाऊन जनजागृती केली. कार्यशाळा आयोजित केल्या आणि महिलांना तसेच मुलींना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले.

## रणजीतसिंघ तबेलेवालेचा खून करणाऱ्या दोघांना चार दिवसांची पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)** –शनिवार दि. ४ एप्रिल रोजी मध्यरात्री जुना मोंढा भागात असलेल्या मुरमुरा गल्लीत एकाचा खून करणाऱ्या दोघांना वजिराबाद पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे. दोन्ही आरोपींना पो. नि. परमेश्वर कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी अटक केली होती.

शनिवारी मध्यरात्री मुरमुरागल्ली परिसरात जुन्या वादामधून रणजितसिंघ तबेलेवाले उर्फ रज्जा (वय ३५) याच्यावर दोन हल्लेखोरांनी तलवारीने सपासप वार केले होते. या घटनेनंतर आरोपी पसार झाले होते. वजिराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, सहायक पोलीस निरीक्षक राजू वटाने, उमाकांत पुणे हे घटनास्थळी पोहोचल्यानंतर त्यांनी जखमी रणजितसिंघला रुग्णालयात दाखल केले होते. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला होता. रविवार, दि. ५ एप्रिल रोजी पहाटे यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली होती. आरोपी मनप्रितसिंघ परविंदरसिंघ काचवाले (२३), परमज्योतसिंघ परविंदरसिंघ काचवाले (२५) दोघेही रा. अबचलनगर, नांदेड) यांना पोलिसांनी सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसाची म्हणजेच १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक राजू वटाणे करत आहेत.

## दरोड्याच्या तयारीत असलेले पाच जण पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या विष्णुपुरी शासकीय रुग्णालय परिसरामध्ये दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना गस्तीवर असलेल्या नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून घातक शस्त्र व अन्य साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई ५ एप्रिल रोजी मध्यरात्री करण्यात आली.

शहराला लागून असलेल्या विष्णुपुरी शासकीय रुग्णालयात बाहेर जिल्ह्यातून तसेच नांदेड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात रुग्ण येत असतात. या रुग्णांना भेटण्यासाठी त्यांचे नातेवाईकही या परिसरात रात्री-बेरात्री दाखल होतात. त्यामुळे गुन्हेगारांचे चांगलेच फावते. अनेक वेळा रुग्णांच्या नातेवाईकांना मारहाण करून लुटल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. असाच एखादा दरोड्यासारखा गंभीर गुन्हा करण्यासाठी रुग्णालय परिसरात अंधारात दबा धरून पाच आरोपी बसले होते. यावेळी नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे पथक रात्रीला गस्तीवर होते. यावेळी पथकाने दबा धरून बसलेल्या बलविंदरसिंघ गुरुमेलसिंघ पवार (वय २७ राहणार गुरुद्वारा गेट नंबर तीन), सुखविंदरसिंघ मेजरसिंघ रॉय (वय २३ राहणार गुरुद्वारा गेट नंबर पाच), कन्हैया माधव कदम (वय २८ रा. लिंबगाव तालुका नांदेड), रणजीतसिंग देविदास डुबुकवाड (वय २१ राहणार साठे नगर कंधार) आणि मोहन ज्ञानोबा डीकळे (वय २८ राहणार पार्डी ता. लोहा) यांनी संघटित होऊन दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना पोलिसांच्या जाळ्यात अडकले. पोलिसांनी त्यांच्याकडून एक खंजर, रॉड, तलवार, लाल मिरची पावडर, नायलॉन दोरी असे साहित्य जप्त केले.

पोलीस अंमलदार मारुती पचलिंग यांच्या फिर्यादीवरून वरील पाच जणांविरुद्ध दरोड्यायासह भारतीय हत्यार कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय कांबळे करीत आहेत.

## राज बारच्या नावाखाली सुरू होता देहविक्रीचा धंदा

### ○ रामतीर्थ पोलिसांच्या कारवाईत सहा महिलांची सुटका, दोन आरोपी अटकेत

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यातील रामतीर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या नरसी शिवारातील देगलूर-नांदेड रोडवरील राज बार अँड रेस्टॉरंट येथे सुरू असलेल्या अवैध देहविक्री व्यवसायावर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सहा पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली तथा श्याम पानेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना गोपनीय माहिती मिळाल्यानंतर डमी ग्राहक पाठवून खात्री करण्यात आली. त्यानंतर पंचांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला.

छाप्यामध्ये राज बार अँड रेस्टॉरंटच्या पहिल्या मजल्यावरील खोलीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे आढळून आले. घटनास्थळावरून आरोपी संतोष श्रीपत पवळे (वय ३०) व शिवराज श्रीपत पवळे (वय ३५, दोघेही रा. बालाजी नगर, नरसी) यांना ताब्यात घेण्यात आले. तपासात सोहेल शेख (रा. पनवेल, मुंबई) हा महिलांना आणून देण्याचे काम करत असल्याचे समोर आले. तसेच ठिकाणाची मालकी श्रीपत आनंदराव पवळे (रा. बालाजी नगर, नरसी) यांची असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत पोलिसांनी ४७,५०० रुपये रोख रक्कम, सहा मोबाईल फोन, एक कार (एमएच १२ एसवाय ६४११) अशा एकूण ६,०७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सुटका करण्यात आलेल्या सहा महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी संबंधित संस्थांकडे त्यांना पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकरणी रामतीर्थ पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या यशस्वी कारवाईबद्दल नांदेडचे पोलीस अधीक्षक अभिषेक कुमार यांनी संबंधित पथकाचे कौतुक केले आहे.

## नांदेड दक्षिण जिल्हा कार्यालयात भाजपा स्थापना दिनाचा जल्लोष

### खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते ध्वजवंदन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त सोमवार, दि. ६ एप्रिल रोजी जल्लोष साजरा करण्यात आला. सकाळी १० वाजता जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या नांदेड दक्षिण जिल्हा कार्यालयात माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते ध्वजवंदन सोहळा पार पडला.

गांधी पुतळ्याजवळील भाजपा जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात आयोजित या सोहळ्यास जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, महापौर कविताताई मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या संकल्पनेतून पक्षाच्या ४६ वर्षांच्या प्रगतीची माहिती दर्शविणारी प्रदर्शनी भरविण्यात आली होती. या




प्रदर्शनीचे उद्घाटन खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्यानिमित्त मध्यवर्ती कार्यालयाची सजावट करून रोषणाई करण्यात आली. फटाक्यांची आतीषबाजी करून उपस्थितांना मिठाई वाटप करण्यात आली. या कार्यक्रमास प्रवीण साले, सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, नंदकुमार कुलकर्णी, बालाजीराव देशपांडे, एल. के. कुलकर्णी, मोहनसिंह तौर, प्रभाकर पेटकर, महेश खोमणे, नगरसेवक अभिषेक सौदे, आशिष नेरलकर, सुमित मुथा, नगरसेविका शांभवी साले, सौ. अमृताताई परिहार, सौ. ज्योतीताई कल्याणकर, बजरंग परिहार, डॉ. बालाजीराव गिरगावकर, बालाजी बच्चेवार, सचिन पाटील उमरेकर, निरंजन पाटील कौडगावकर, मनोहर पवार, बालाजी मद्देवाड, संतोष पाटील मुळे, बालाजी पाटील शेळगावकर, शंकर मनाळकर, जयप्रकाश येवले, शैलेंद्र ठाकूर, हरभजनसिंघ पुजारी, गुरप्रीतसिंघ सोखी, गुरुदीप सिंघ संधू, केदार नांदेडकर, बाबुराव सुंकेवार, शिवशंभ देशमुख, राजेश केंद्रे, हरीशभाई ठक्कर, राज यादव, दीपकसिंह ठाकूर, सदाशिव कल्याणकर, सौ. मानिनी नांदेडकर, गजानन उबाळे, निरंजन चव्हाण, किशनराव कल्याणकर, शंकरराव काळे, सुधीर हंबर्डे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नगरसेवक उपस्थित होते.

## महाराणा प्रतापसिंह पुतळा परिसर सुशोभिकरणाची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील राष्ट्र महापुरुष शूरवीर महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळा परिसराच्या सुशोभिकरणाचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी श्री क्षत्रिय समाज राजपूत संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात खा. अशोकराव चव्हाण आणि महापालिकेच्या महापौर कविता मुळे यांना निवेदन देण्यात आले असून, पुतळा परिसरातील संपूर्ण चौथऱ्याचे नुतनीकरण व सुशोभिकरण त्वरित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सन २०२४ पासून या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## भाजपा स्थापना दिनानिमित्त नगरसेविका काकडे यांच्या संपर्क कार्यालयात ध्वजारोहण

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –मनपाच्या प्रभाग क्रमांक १९ भाजपा नगरसेविका श्रीमती सुलोचना काकडे यांच्या कार्यालयात भाजपा स्थापना दिवस निमित्ताने ध्वजारोहण व मिठाई वाटप करून भाजपा पक्ष दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मिठाई वाटप करण्यात आली.

भाजपा पक्ष १९८० साली स्थापन झाला. या अनुषंगाने प्रभाग क्रमांक १९ च्या नगरसेविका श्रीमती सुलोचना धोंडीबाराव काकडे यांच्यावतीने कार्यालयात भाजपा ध्वजारोहण करून भाजपा दिवस साजरा केला. यावेळी श्रीमती पंचफुलाबाई नरोजी काकडे, मंजुळा काकडे, संजीवनी काकडे, कांताबाई काकडे, वैशाली काकडे, सुरेखा काकडे,



उषा काबरा, ललिता राहाटकर, अश्विनी गोरकटे यांची उपस्थिती होती.

## वाहतूक शाखेकडून वाहनधारकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न; नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि वाहन नियमभंगावर आळा घालण्यासाठी शहर वाहतूक शाखा वजिराबादने विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत अवैध प्रवासी वाहतूक, विनापरवाना धावणारी वाहने, फटाका बुलेट, ट्रिपल सीट, मोबाईल वापरत वाहन चालविणारे तसेच रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या फळगाड्यांवर कारवाई करत एकूण २४१ केसेस नोंदवण्यात आल्या.

ही मोहीम वरिष्ठांच्या आदेशानुसार शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी पथकासह राबवली. शहरातील रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदिर वर्कशॉप, राजकॉर्नर आणि छत्रपती चौक या प्रमुख भागात वाहनांची कागदपत्र तपासणी करण्यात आली.

तसेच ऑटोचालकांना गणवेश परिधान करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. या कारवाई दरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून तब्बल २ लाख ५४ हजार ५५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. रस्त्यावर अतिक्रमण करणारे हातगाडे व वाहने हटवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहनधारकांनी पार्किंगच्या ठिकाणीच वाहने उभी करावीत, सिग्नलचे पालन करावे आणि रस्त्यावर अतिक्रमण टाळावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

नियमांचे उल्लंघन केल्यास मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्थेसाठी ही कारवाई महत्त्वाची ठरत असून, नागरिकांनीही सहकार्य करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.



**मुखेड**–कंधार विधानसभेचे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या नेतृत्वाखाली भाजपा जनसंपर्क कार्यालय येथे भारतीय जनता पक्षाच्या स्थापनादिनानिमित्त उपाध्याय पंडित दीनदयाळ यांच्या विमुक्त जाती सेवा समिती वसंत नगर संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष गंगाधरराव राठोड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण स्थापना केले. यावेळी खुशालराव पाटील, अशोक गजलवाड, किशोरसिंह चौहान, राजकुमार बामणे, सुधीर चव्हाण, करण रोडगे, शिवाजी राठोड, राजू गंदपवाड, बाळू नाईक, गजानन अकुलवाड यांच्यासह सर्व नगरसेवक, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : गणेश आंबेकर, मुखेड)

## ‘जय जगदंब’ कॉफीटेबल पुस्तक इतिहास संशोधकांसाठी अभ्यासपूर्ण -खा. अशोकराव चव्हाण

**तुळजापूर (प्रतिनिधी)** –आई तुळजाभवानी देवीची महती सांगणारे श्रीकृष्ण दीक्षित यांनी लिहिलेले ‘जय जगदंब’ हे पुस्तक आदिमाता जगदंबेचा गौरवशाली इतिहास आणि तिचे अथांग वैभव अगदी सहज व रसाळ भाषेत भाविकांपर्यंत पोहोचणार आहे. भाविकांसह इतिहास संशोधकांसाठी हे पुस्तक अभ्यासपूर्ण आहे. लेखक श्रीकृष्ण दीक्षित यांनी शब्दांच्या माध्यमातून मांडलेला हा भक्तिभाव सर्वच भक्तांसाठी मार्गदर्शक आणि संग्रही ठेवावा असाच आहे, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.

श्रीकृष्ण गंगाधरराव दीक्षित यांच्या लेखणीतून साकारलेल्या ‘जय जगदंब’ या धार्मिक कॉफीटेबल पुस्तकाचा प्रकाशन सोहळा माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी मंत्री आ. राणा जगजितसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी तुळजापूर येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर आ. सतीश चव्हाण, माजी आ.



सौ. अमिताताई चव्हाण, आ. जितेश अंतापूरकर, आ. श्रीजया चव्हाण, माजी राज्यमंत्री डी. पी. सावंत, माजी आ. हनुमंत पाटील बेटमोगरेकर, कार्यक्रमाचे आयोजक माजी आ. अमरनाथ राजूरकर, ॲड. चैतन्यबापू देशमुख, सौ. मृणालताई राजूरकर, सौ. सुषमा दीक्षित आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात श्री तुळजाभवानी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व मराठी गीत गायनाने झाली.

पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, श्रीकृष्ण दीक्षित यांनी कोविडच्या काळाचा सदुपयोग करुन हे माहितीयुक्त पुस्तक लिहिण्यास प्रारंभ केला होता. तुळजाभवानीच्या भाविकांसाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे. या पुस्तकात तुळजाभवानीची सविस्तर आराधना असून, दुर्मिळ फोटोही आहेत. विशेष म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल आणि निजाम यांचा एक ऐतिहासिक फोटो आहे. तो फोटो म्हणजे इतिहास संशोधकाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन अमरनाथ राजूरकर यांनी केले. तसेच आ. जगजितसिंह राणा पाटील यांनी ‘जय जगदंब’ हे पुस्तक अतिशय दर्जेदार असून, भक्तांना उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन केले.

ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी नांदेडच्या महापौर कविता मुळे, विरेंद्रसिंग गाडीवाले, ॲड. महेश कनकदंडे, सदिच्छा सोनी, विजय चव्हाण, भगवानराव दंडवे, संतोष कुलकर्णी, शंकर बोलमवाड, सौ. विश्रांती कदम, विनोद गंगणे, सुनील चव्हाण, रामचंद्र रोचकरी, औदुंबर कदम, अप्पासाहेब पाटील, धीरज पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com